म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
ग.क्र. : २२३६१

# किनारा

जयवंत दळवी



IRBK-0122371

# किनारा

## दोन अंकी कौटुंबिक नाटक

जयवन्त दळवी

IRBK-0122371

मॅजेस्टिक प्रकाशन

पहिली आवृत्ती :
ऑक्टोबर, १९८७

© सौ. उमा दळवी

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेंबर्स,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

मूल्य : २० रुपये

क्र. ...
दि. ...

या नाटकाचा पहिला प्रयोग कलावैभव, मुंबई, या संस्थेतर्फे शनिवार, १ नोव्हेंबर, १९८६ रोजी दुपारी ४ वाजता शिवाजी मंदिर, मुंबई, येथे सादर करण्यात आला.

दिग्दर्शक : प्रा. मधुकर तोरडमल

सूत्रधार : मोहन तोंडवळकर
निर्मिती : सौ. माधवी तोंडवळकर
नेपथ्य : रघुवीर तळाशिलकर
ध्वनिसंयोजन : राजा देसाई
प्रकाश–योजना : हर्षद तोंडवळकर
रंगभूषा : दत्ता परब

शिरूभाऊ : प्रा. मधुकर तोरडमल
जिजी : फैयाझ
फडके : हिंदुराव पाटील
यदुनाथ : रमेश भाटकर
श्यामा : प्रमोदिनी जाधव
शैला : सविता मालपेकर

या नाटकाच्या तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी लिहा :

सौ. उमा जयवन्त दळवी। १३, विकास। भवानीशंकर रोड। मुंबई ४०० ०२८.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय
नों. दि ..............
वा. क्र. ...
वि. ............... क्र. ...............

# अंक : पहिला

[ मध्यमवर्गीय वस्तीतल्या एका ब्लॉकचा दिवाणखाना. हा चार–पाच खोल्यांचा चांगला ओनरशिपचा ब्लॉक आहे. प्रत्येक मजल्यावर दोन–दोन ब्लॉक आहेत. पडदा वर जाताच एक नीटनेटका दिवाणखाना दृष्टीस पडतो. उत्तम दर्जाचे फर्निचर, टेलिफोन, टी. व्ही., व्हीडिओ अशी सर्व साधने दिसतात. एका कोपऱ्यात स्वयंपाकघराच्या दाराशी एक गोलाकार डायनिंग टेबल आहे. तेथे तीन–चार खुर्च्या आहेत. दुसऱ्या बाजूला बैठकीची व्यवस्था, सोफासेट वगैरे.
हा ब्लॉक शिरुभाऊंचा आहे. ते एका साबणाच्या कारखान्याचे मॅनेजर आहेत. वयाने जास्तीत जास्त पन्नास वर्षे गाठलेले. जिजी ही त्यांची पत्नी. वयाने त्यांच्यापेक्षा दोन–तीन वर्षांनी मोठी.
पडदा वर जाताच दोन क्षणांनी ती स्वयंपाकघरातून बाहेर येते. पोटाला बांधलेला ॲप्रन काढून टेबलावर आपटते. आणि तेथेच एका खुर्चीत बसते. ती आहे त्यापेक्षा अधिक प्रौढ दिसते. कानशिलांकडे तिचे केस किंचित पांढरे झालेले आहेत. शिवाय मानसिक त्रासामुळे तिला डोकेदुखीचाही विकार जडलेला आहे. ती बसते आणि डोके चोळते. तिच्या हातात बामची बाटली आहेच. ती बाम डोक्याला चोळते.
तेवढयात दारावरची वेल वाजते. जिजी दरवाजा उघडते. शेजारचे फडके आत येतात. हे वयाने सत्तावन वर्षांचे आहेत. चेहऱ्यावरून आनंदी आणि समाधानी दिसतात. नोकरीला पोस्टात आहेत. या क्षणी ते घरच्या पोशाखात आहेत. ]

फडके : ( आत येत ) डोकं कुणाचं दुखतंय्, जिजी ?
जिजी : माझंच ! ( क्षीण हसत ) का ?

फडके : एकदम बामचा वास आला... ( थांबून ) तुमचं हल्ली वारंवार डोकं दुखतंय् , जिजी ! बघावं, तेव्हा...

जिजी : काय करणार ?

फडके : बरं नव्हे ते रोजच्या रोज.

जिजी : ( त्रासून, क्षीण हसून ) चालायचंच !

फडके : डॉक्टरला दाखवा. शिरूभाऊंना घेऊन जा...

जिजी : ( क्षीण हसत ) त्यांनी कधी विचारलं सुद्धा नाही मला....डोकं दुखतंय् का ? बामच्या वासानं मात्र चिडतात...

फडके : गेले कारखान्यात ?

जिजी : कोण ?

फडके : शिरूभाऊ !

जिजी : ते इथं कुठं आहेत ?

फडके : ( आश्चर्याने ) म्हणजे ?

जिजी : ते दिल्लीला गेलेत.

फडके : ( चक्रावून ) कधी ?

जिजी : चार दिवस झाले !

[ फडके एकदम गोंधळतात. कारण कालच त्यांनी शिरूभाऊंना मुंबईतच एका बाईबरोबर पाहिले होते. पण ते जिजींच्या लक्षात येऊ नये, म्हणून सावरून घेतात. ]

फडके : अस्सं....अस्सं ! हो, हो...दिल्लीला गेलेत....बरोबर !

जिजी : ( संशयाने बघत ) का ? काय झालं ?

फडके : नाही ! माझ्या लक्षात नाही राहिलं, शिरूभाऊ म्हणाले होते...दिल्लीला जायचंय् , म्हणून ! ( एकदम आठवून ) हो, आलो होतो...म्हणजे...ही तुमची सेव्हिंग्ज सर्टिफिकेट्स द्यायची होती. ( देतात ) यदुनाथ कुठं बाहेर गेलाय् का ?

जिजी : नाही ! आहे आत. मॅच चालीय् ना ? तुम्ही सांगा त्याला....फडकेकाका, काही अभ्यासाचं...

फडके : मी तर रोजच म्हणतोय्...

जिजी : हुशार मूळचा. पण आता अभ्यासाकडे लक्षच नाही.

फडके : म्हणून तर मी त्याला माझ्या घरी झोपायला बोलावतो.

जिजी : ( हाक मारते ) यदुनाथ, यदू... अरे फडकेकाका आलेत.

[ यदुनाथ बाहेर येतो. वयाने विशीतला, खुरटी दाढी वाढलेली. केस विस्कटलेले, कानावर ट्रान्झिस्टर धरून येतो. ]

फडके : अरे, गेले दोन–तीन दिवस झोपायला आला नाहीस?
यदुनाथ : भाऊ नाहीत सध्या घरी! म्हणून इथंच झोपतो.
फडके : अभ्यास करतो आहेस ना?

[ तो न ऐकताच गॅलरीत जातो. कॉमेन्ट्रीत तंद्री. गॅलरीत कानावर ट्रान्झिस्टर धरून उभा. ]

जिजी : अशानं याचं पोट का भरणार आहे?
यदुनाथ : ( हर्षभराने ओरडतो ) आऊट....आऊट...!

[ आणि तिथेच नाचतो. क्षणभर जिजी आणि फडके त्याला बघत राहतात. त्याचे लक्ष नाही. ]

फडके : ( जायला निघतात.) येतो मी, जिजी...
जिजी : आज ऑफिसात नाही गेलात?
फडके : आज नीताकडे जाणार आहे...भिवंडीला...
जिजी : नीताचं काही नवंजुनं?
फडके : दोन महिने झालेत! त्रास होतोय्.
जिजी : कडक डोहाळे दिसतात....
फडके : हो! म्हणून आज जाऊन येणार....
जिजी : राहणार भिवंडीला?
फडके : राहीन दोन दिवस गेल्यासारखा! ( थांबून ) आज आमची कमल असती, तर मला चिंता नव्हती.
जिजी : ( ते जायला वळणार, तोच) तुम्हांला रोजच्या रोज त्रास द्यायला...
फडके : काय झालं?
जिजी : श्यामाचं, हो!
फडके : तिच्या लग्नाचं ना?
जिजी : हे आले दिल्लीहून, म्हणजे त्या परांजप्यांच्या स्थळाबद्दल बघायला हवं.
फडके : मी म्हटलं होतं शिरूभाऊंना...आपण तिथं जाऊ, म्हणून....
जिजी : (काळजीने ) त्यांचं तर लक्षच नाही.

फडके : कधी येतो, म्हणाले ?

जिजी : काल येणार होते ! लग्नाचं एकदा राहिलं, म्हणजे राहून जातं ! मला अनुभव आहे. वेळीच लग्न झालं, म्हणजे बरं असतं...नाहीतर मग पुढं चांगला चॉईस राहत नाही. येईल तो मुलगा घ्यावा लागतो.

फडके : जमेल, हो ! श्यामा काही एवढी मोठी झालेली नाही. ऑफिसला गेली का ?

जिजी : हो !

फडके : येतो मी. शिरूभाऊ आले, की मी येतो...बोलतो त्यांच्याशी. ( जातात.)

[ जिजी सोफ्यावर बसते. कपाळ चोळते. तेवढ्यात मॅचमध्ये षट्कार मारल्यामुळे यदुनाथ एकदम ओरडतो. जिजी कपाळ चोळता चोळता यदुनाथकडे पाहते. ]

जिजी : (वैतागाने हाक मारते ) यदू...(यदू येतो ) तो ट्रान्झिस्टर काढून मी रस्त्यावर फेकून देणार...

यदुनाथ : ( न कळून ) का ?

जिजी : तुला लाज वाटायला पाहिजे.

यदुनाथ : कसली ?

जिजी : पुन्हा पुन्हा बारावीला नापास होतो आहेस.

यदुनाथ : जिजी, मी तरी काय करू ?

जिजी : अभ्यास कर मन लावून...

यदुनाथ : मन लावून ! जिजी, मन लागत नाही, त्याला मी काय करू ?

[ ती त्याच्याकडे असहायपणे बघत राहते. तेवढ्यात घंटा पटापट दोनदा वाजते. ही शिरूभाऊंची घंटा वाजविण्याची पद्धत आहे. ]

जिजी : ( एकदम घाबरून उठत ) हे आले, की काय ?

यदुनाथ : ( भिऊन ) भाऊ ?

[ एकदम गॅलरीत पळ काढतो. जिजी दार उघडते. शिरूभाऊ आत येतात. वय पन्नाशीचे. आकर्षक, उत्तम प्रकृती. हातांत कपड्यांची बॅग आणि छोटी ब्रीफकेस. ते आल्याबरोबर काहीही न बोलता जिजी स्वयंपाक घरात जाते. यदुनाथ संबंध नसल्यासारखा गॅलरीत उभा आहे.

शिरूभाऊ सुटात आहेत. ते कोट काढून कोचावर टाकतात. ब्रीफकेस मांडीवर घेऊन ऑफिसात असल्याप्रमाणे कागद चाळू लागतात. अधून मधून किंचित चोरटेपणाने इकडे तिकडे बघतात, अंदाज घेतात. मध्येच गॅलरीतून यदुनाथ हात उडवीत 'आऊट' असे ओरडतो. शिरूभाऊ नाराजीने गॅलरीकडे वळून बघतात. यदूला वाटते ... त्यांना स्कोअर हवा आहे]

यदुनाथ : (कॉमेंटरी केल्याप्रमाणे) आऊट ... गावस्कर आऊट फॉर थर्टी ... कॉट बाय् लॉईड्स ... बोल्ड बाय् रॉबर्ट्स ... (त्या त्या वेळी नावे बदलावीत.)

[मग लगेच मान वळवून तो ट्रान्झिस्टर ऐकण्यात मग्न होतो. शिरू-भाऊ वैतागतात. हा पोरगा आता हाताबाहेर गेलाय्....या अर्थी मान हलवतात. आणि पुन्हा आपल्या कागदपत्रांत लक्ष घालतात. तेवढ्यात स्वयंपाकघरातून जिजी येते. डोळे काळवंडलेले. दूर डायनिंग टेबलाकडे उभी राहते आणि...]

जिजी : तुम्ही आता जेवून जाणार आहात का ?

[शिरूभाऊ तिच्याकडे वैतागून पाहतात. चश्मा काढतात.... बघतात.]

शिरूभाऊ : एकदा आरशात तोंड बघा...

जिजी : (थंडपणे) तुम्ही आता जेवून जाणार आहात ?

शिरूभाऊ : तू एका सोप-फॅक्टरीच्या मॅनेजरची बायको. (जिजी थंडपणे बघत राहते.) पण तोंड बघा...कपडे बघा... आंघोळीला पाणी नाही... तोंड धुवायला साबण नाही. त्या घामचा घाणेरडा वास...

जिजी : (तेवढ्याच थंडपणे) आता साडेअकरा वाजले आहेत. आणि तुम्ही फॅक्टरीला निघाल्यासारखे बसलाहात...म्हणून विचारतेय्....

शिरूभाऊ : थंड आईस्क्रीम-कॉफी घेईन....

जिजी : आईस्क्रीम केलेलं नाहीये....

शिरूभाऊ : का ?

जिजी : खालून 'अप्सरा' मधून आणायला सांगते.

शिरूभाऊ : (चिडून) पण तू का नाही केलंस ?

जिजी : ( जरा चिडून ) तुम्ही दिल्लीला होता...
शिरूभाऊ : ( मध्येच तोडून ) हे तुझं नेहमीचंच आहे. काही नवीन नाही. मला आवडतं, तेच नेमकं करायचं नाही !
जिजी : ( नर्व्हस होत ) आणायला सांगू का आईस्क्रीम ?
शिरूभाऊ : काही नको. साधी गरम कॉफी कर. ( ती जाता जाता ) चांगली कडक कर....नाहीतर डोक्यावर ओतीन !
जिजी : ( वळून ) चार दिवस घर कसं थंड होतं.
शिरूभाऊ : ( चिडून ) तुमची लायकीच ती...!
जिजी : घरातल्या तुमच्या या वागण्यानं .... माझं सोडा ... पण पोरांची काय वाताहत होतेय् , ती बघा ... थोरली श्यामा लग्नावाचून राहिलीय् . आणि यदू...सारखा नापास होतोय् ...
शिरूभाऊ : हे सगळं तुझ्यामुळंच ! ( ती बघतच राहते. ) सारखं पिरपिरत बसायचं ....फडफडत बसायचं...!
जिजी : मग आपण तसं वागावं नीट...
शिरूभाऊ : म्हणजे कसं ?
जिजी : ते तुमच्या मनाला विचारा...
शिरूभाऊ : ( जरा चपापल्यासारखे होतात. ) हल्ली फार बोलायला लागली आहेस. घरात कसलं म्हणून लक्ष नाही. दुसऱ्यांच्या बायका बघा....
जिजी : ( चिडून ) तुम्ही दुसऱ्यांच्याच बायका बघा...! (ते किंचित गडबडतात. ) लक्ष नाही म्हणता...काय लक्ष दिलं नाही ! नोकरी सोडून इथं राबतेय्...

[ ते चिडून सोफ्याची फोमची गादी अस्वस्थपणे चाचपतात. गादीच्या रेक्झिनला कोपऱ्यात दुरूनही दिसेल, असा बैठकीकडे भोकसा पडलेला आहे. तो दाखवीत. ]

शिरूभाऊ : हा हा सोफा बघ ! इथं जरा शिवण सुटली, त्याच वेळी दोन छान टाके मारायचे...ते नाही ! आता केवढा भोकसा झालाय् , बघ....!
जिजी : तुमचेच मित्र प्यायला येतात आणि तो कोपरा फाडत बसतात...
शिरूभाऊ : ( चिडून ) खोटं आहे ! हा हा ... तुझा शेजारचा....( ती एकदम नापसंतीने टवकारून बघते. ) व्हॉलेण्टीयर ...फडके ... तुझा मानलेला भाऊ ... कसलं तरी निमित्त काढून येणार....कशासाठी येतो, परमेश्वर जाणे ! ( ती एकदम जळजळीत नजरेनं पाहते. ) भाऊबीजेला पंधरा-वीस रुपये वर्षातून एकदा घालायचे .... आणि वर्षभर येत राहायचं ....

हे मानलेले भाऊ आणि मानलेल्या बहिणी. या दोघांनाही एकदा झोडपायला पाहिजे. मला भारी तिटकारा आहे असल्या पोरकट नात्यांचा! येणार आणि इथं बसणार ... आणि थंड बसणार नाही... बोटं सारून सारून सगळा रबर बाहेर काढ, म्हणावं... (ती आत जाऊ लागते.) थांब! मी दिल्लीला जाण्यापूर्वी याच्या (यदुनाथच्या) कानफटात मारून त्याला दाढी काढून टाकायला सांगितलं होतं...आणि तुलाही मी बजावलं होतं... (त्याच्याकडे वळून बघतात. त्याचे लक्ष नाही.) तुला सांगतो....जिजी...

जिजी : पण त्यानं का दाढी काढायची?

शिरूभाऊ : (चिडून) मी सांगतो, म्हणून! मी उभ्या आयुष्यात कधी दाढी वाढवलीय्? जरा दाढी वाढली...केस वाढले, तर मामा पाठ फोडून काढायचे.

जिजी : जिथं तिथं तुमची दुसऱ्यावर जबरदस्ती! त्या श्यामाला नोकरी करू दिली नाही.

शिरूभाऊ : पण करते ना आता मोठी नोकरी?

जिजी : आता करते, म्हणजे मी पिच्छा पुरवला म्हणून ... आणि फडक्यांनी नोकरीला लावली, म्हणून...

शिरूभाऊ : पण गरज काय तिला नोकरीची? कुणाची मुलगी ती?

जिजी : म्हणूनच मी पिच्छा पुरवला! नोकरी नसली, म्हणजे काय होतं, ते मी अनुभवलंय् ....बी. ए. असूनसुद्धा!

शिरूभाऊ : त्या डिग्र्या काय चाटायच्यात? मी मॅट्रिक नाही, म्हणून जेव्हा तेव्हा डिग्रीची मिजास मारीत असतेस...मामांच्या दुकानात राब राब राबायचं...आणि फूटपाथवर झोपायचं .... शिकायला वेळ होता कुणाला? म्हणून काय कमी पडलंय्? माणूस कर्तबगार असला, म्हणजे कुठंही चमकतो. झालोच ना सोप फॅक्टरीचा मॅनेजर? आमचा साबण...

जिजी : आता चारित्र्य स्वच्छ करणारा एखादा साबण शोधून काढा.

[संतापाची सणक त्यांच्या डोक्यात जाते.]

शिरूभाऊ : तुझं थोबाड फोडल्याशिवाय....(ब्रीफकेस बाजूला ठेवून उठू लागतात.)

जिजी : (भीतीने हाक मारते.) यदू...

यदुनाथ : (एकदम वेगाने पुढे येत) आऊट... आऊट...! (मोठ्याने ओरडतो.) आऊट...!

शिरूभाऊ : (किंचित भीतीने वरमून) काय ..?

यदुनाथ : गायकवाड आऊट! रन आऊट...!

शिरूभाऊ : ( चिडून ) शरम नाही वाटत...?

यदुनाथ : गायकवाड रनाऊट झाला, म्हणून...?

शिरूभाऊ : ( मारण्याची इच्छा, पण मनात भीती. ) हे जे तुझं काही चाललंय् ना...

यदुनाथ : माझं...?

शिरूभाऊ : शटप् ! गेली तीन वर्षं बारावीत नापास होतो आहेस. अभ्यासाला एवढी मोठी जागा असून...

जिजी : नुसती जागा असून भागत नाही. तसं वातावरण पाहिजे. इथं तर क्षणभरसुद्धा राहावंसं वाटत नाही.

शिरूभाऊ : ( चिडून ) मग रस्ता पकडा....चालायला लागा....!

यदुनाथ : ( धीर धरून ) ती का जाईल ? जागा तिच्या नावावर आहे.

शिरूभाऊ : ( फाडकन त्याच्या थोबाडात मारतात ) हे तू मला सांगतोस ? जा... आणि अभ्यासाला बस. ( तो गुपचूप गॅलरीत जातो. )

जिजी : ( स्वतःशीच बोलल्यासारखी ) पूर्वी किती हुशार होता...दुसरा-तिसरा नंबर कधी सोडला नाही. काल-परवापर्यन्त कविता किती सुंदर करायचा...

शिरूभाऊ : ( वेडावीत ) कविता किती सुंदर करायचा ! अभ्यास कर, म्हणावं... ( ते यदुनाथकडे वळून बघतात. तो ट्रान्झिस्टर ऐकतो आहे. जिजी तशीच उभी आहे. ) तू अशी ठोंब्यासारखी उभी का ? जा, आत जा आणि कॉफी आण. ( ती आत जाते. )

[ शिरूभाऊ बॅगेची आवराआवर करतात. तेवढ्यात दारावरची बेल वाजते. ]

शिरूभाऊ : कोण....?

यदुनाथ : ( दार उघडून ) या...( शिरूभाऊंना ) फडकेकाका...

शिरूभाऊ : या...फडके...

फडके : ( छद्मी हसत ) शिरूभाऊ, तुमची दिल्लीची ट्रिप कशी झाली ?

शिरूभाऊ : ( किंचित गडबडून ) का ? काय झालं ?

फडके : ( तसेच हसत ) काय झालं ?

शिरूभाऊ : नाही ! असे हसताय् , ते...?

फडके : ( यदुनाथला ) अरे यदू...( यदुनाथ जवळ येतो ) ही किल्ली घे.... माझी बॅग आहे टेबलावर ती जरा घेऊन ये....जा...

शिरूभाऊ : कुठं चाललात ?
फडके : भिवंडीला. नीताकडे. ( यदुनाथ किल्ली घेऊन बाहेर जातो. ) शिरूभाऊ, ( हसतात ) तुमचं डेअरिंग म्हणजे....
शिरूभाऊ : ( गोंधळून ) काय झालं ?
फडके : ( चोरट्या आवाजात ) दिल्ली तो बहोत दूर है, म्हणतात....
शिरूभाऊ : म्हणजे ?
फडके : तुमची दिल्ली मुंबईतच.
शिरूभाऊ : म्हणजे काय ?
फडके : आता, शिरूभाऊ, आणखी पेडगावला जाऊ नका. दिल्लीला जातो, म्हणून तुम्ही चार दिवस त्या पोरीबरोबर....
शिरूभाऊ : कुठल्या पोरीबरोबर ?
फडके : मुक्काम शालिमार....हॉटेल...

[ दोन्हींकडे छातीकडे आंब्यासारखे कंस करीत ]

शिरूभाऊ : तुम्ही पाहिलंत ?
फडके : मला कळलं...
शिरूभाऊ : कुणी सांगितलं...?
फडके : वरच्या करंदीकरांनी पाहिलं...( एकदम घाबरून ) त्यांना विचारू मात्र नका, हो ! ( दोन्ही बाजूंना हातांचे कंस करीत ) राजापुरी आंबे... राजापुरी आंबे म्हणत फिरताहेत...करंदीकर !
शिरूभाऊ : ( चिडून ) मग घाल म्हणावं मोरांबा ! आंबटशौकीन साले...!
फडके : ( खाजगीत ) पण कोण ती ?
शिरूभाऊ : ( वैतागून ) कुठं कोण ? कोणाला त्यांनी पाहिलं, कोण जाणे !
फडके : ( हसते ) अहो, तुमच्या मुलानंही तुम्हांला पकडलं ?
शिरूभाऊ : ( दचकून ) कुणी ? यदूनं ?
फडके : हो !
शिरूभाऊ : ( गडबडून ) कुठं ?
फडके : स्टर्लिंग सिनेमा ! ‘ ग्रेट लिटल् होअर हाऊस ’ पिक्चर लागलंय् ना ?
शिरूभाऊ : ( एकदम चिडून ) तुम्ही त्याच्या, फडके, कानफटात मारायला पाहिजे होतं.
फडके : कुणाच्या ? ( हाताने आवाज खाली करायला सांगतात. )
शिरूभाऊ : ( खालच्या आवाजात ) यदूच्या !

फडके : का ?

शिरूभाऊ : हा बारावीला सारखा नापास होतोय् आणि असली घाणेरडी पिक्चर्स पाहतोय्...वेश्या—व्यवसायावरचं पिक्चर...डॅम डर्टी...!

फडके : त्यानं तुम्हां दोघांना शालिमार हॉटेलपर्यन्त फॉलो केलं....अगदी रूम नंबर तीनशे-तीनपर्यन्त...थ्री झीरो थ्री...

शिरूभाऊ : ( चिडून ) ही आजकालची पोरं ! मोठ्या माणसांबद्दल कसला आदर म्हणून नाही....

फडके : ( चेष्टेने ) मोठी माणसं आधी फार मोठी...( हसतात. )

शिरूभाऊ : ( आवाज मारून ) या कारट्यानं हे जिजीला सांगितलंय् ?

फडके : नसावं ! मी त्याला सांगितलं होतं....घरी सांगायचं नाही, म्हणून.... ( संशयाने ) तिनं विचारलं ?

शिरूभाऊ : ती काय विचारते ! मी आल्याबरोबरच आवाज चढवून सगळ्यांना दमात घेतो...

फडके : ( समजावीत ) पण, शिरूभाऊ, तुम्ही हे आता आवरायला हवं.... बेअब्रू तर होतेच...पण घर विस्कटतं ! यदू नापास होतोय्, तो यामुळं....

शिरूभाऊ : याच्याशी त्याचा काय संबंध ?

फडके : आपला बाप कसा असावा, याचं एक सुंदर चित्र असतं मुलांच्या मनात. ( तेवढ्यात यदुनाथ बॅग घेऊन येतो. ) ( बॅग ) जड आहे ना ?

यदुनाथ : खूपच आहे...जड.

फडके : किलोभर दुधी हलवा घेतलाय्...नीताला खावासा झालाय् ..

यदुनाथ : मला वाटलं, मोरांब्याच्या वाटल्या आहेत, की काय ? ( शिरूभाऊ गडबडतात. )

शिरूभाऊ : ( भडकून ) जा जा....अभ्यास कर जा...!

[ त्या आवाजाने जिजी बाहेर येते...तिला बघून गडबडतात. ]

शिरूभाऊ : पुन्हा पुन्हा नापास होतोय्...बीएस्सी, एम्‌एस्सी झाला असतास...तर फॅक्टरीत लावून दिला असता....( जिजी आत जाते. ) तीनदा बारावीला बसला...

फडके : ( काहीतरी महत्त्वाचे सांगावे, तसे. ) यदुनाथ, तू असं का करत नाहीस ?

यदुनाथ : कसं ?

फडके : तू एप्रिलच्या परीक्षेला बसू नकोस ! ऑक्टोबरच्या परीक्षेला बस...

शिरूभाऊ : म्हणजे काय होईल!
फडके : पास होण्याची शक्यता अधिक.
शिरूभाऊ : का?
फडके : कारण ऑक्टोबरच्या परीक्षेला नव्वद टक्के नापास झालेलीच पोरं असतात.
यदुनाथ : गेली दोन वर्षं मी...
शिरूभाऊ : ऑक्टोबरच्याच परीक्षेला बसतोय् तो...
फडके : (गोंधळून) अस्सं होय? मग एप्रिलच्या परीक्षेला बसून बघ. (यदुनाथ वैतागून हसतो.) हसलास का?
यदुनाथ : आता माझा, काका, विचार आहे, की थोडे पेपर एप्रिलमध्ये द्यायचे... आणि उरलेले ऑक्टोबरात ..
फडके : म्हणजे काय होईल?
यदुनाथ : दोन्ही परीक्षांत नापास होता येईल...(कडवटपणे हसतो.)
शिरूभाऊ : (वैतागून) घ्या...ही ह्यांची अवस्था...ही ह्यांची अक्कल. कानाला ट्रान्झिस्टर लावून फिरायचं...(यदुनाथ गॅलरीत गेलेला आहे.)
फडके : स्कोअर काय?
शिरूभाऊ : मला विचारू नका...मला तर मॅच कुठं असते आणि कोण खेळतात, याचासुद्धा पत्ता नसतो.
यदुनाथ : (एकदम मोठ्याने ओरडतो.) आऊट आऊट...किरमाणी आऊट! थ्री फॉर थर्टी...
फडके : थ्री फॉर थर्टी! तुम्ही या लोकांना साबण विकायला ठेवा...!
शिरूभाऊ : तुम्ही मला विचाराल, तर मी क्रिकेटलाच बंदी करीन. अगदीच खेळायचंच असलं, तर जगात कुठंही...पण वर्षातनं एकदा खेळा....पाच दिवस काय तो हैदोस घाला...आणि एकदाचे कामाला लागा...हे, रे, सालं काय? वर्षभर आपल्या क्रिकेटच्या मॅचेस्? इथं मॅच असली, की सगळे लीव्ह घेऊन टी.व्ही.समोर... आणि जगात कुठंही असली, की कानाला ट्रान्झिस्टर! काही काम नाही, धंदा नाही. प्रॉडक्शन नाही... नॉन्सेन्स....!

[बोलता बोलता फडके फाटका कोपरा पोखरण्यात मग्न झाल्याचे त्यांच्या लक्षात येते. ते बाजूचे वेस्ट-पेपर-बास्केट आणून फडक्यांच्या पुढ्यात ठेवतात]

फडके : ( गोंधळून ) हे काय !

शिरूभाऊ : ( वैतागून ) तो रबर पोखरून सगळा याच्यात टाका...मी केरळात जातो....रबराची लागवड करायला...

फडके : ( एकदम गडबडून उठतात. ) ते जरा शिवून घ्या...निघतो मी...

शिरूभाऊ : तुम्ही आला होता कशासाठी ?

फडके : ( हसत ) तुम्हांला वाटलं, रबर काढण्यासाठी ? सहज आलो....म्हटलं... दिल्लीच्या ट्रिपचं विचारावं...( हसतात ) आता परत कधी ?

शिरूभाऊ : ( न कळून ) काय ?

फडके : दिल्लीला ? ( हसतात)

[ शिरूभाऊ त्यांची बॅग उचलतात व फडक्यांच्या हाती देतात. फडके जातात. ते बाहेर पडतात, न पडतात, तोच जिजी बाहेर येते. तिच्या हातात छोटा स्टेनलेस स्टीलचा डबा आहे. ]

जिजी : ( यदुनाथला ) फडकेकाका गेले का, रे, यदू ?

शिरूभाऊ : ( नरम झाले आहेत. ) हो ! का ? ( ती उत्तर देत नाही. )

यदुनाथ : का, ग, जिजी ?

जिजी : अरे, हा डबा द्यायचा होता...

शिरूभाऊ : काय आहे ते ? ( ती उत्तर देत नाही. )

यदुनाथ : नीतासाठी ?

जिजी : हो ! थालिपीठं आहेत. ( डबा देत ) धावत जा...( तो धावत जातो. जाता जाता ) आणि डबा त्यांचाच आहे, म्हणावं. ( तो जातो. )

[ क्षणभर हे चालू असताना शिरूभाऊ तिच्याकडे बघत राहतात. आपल्या एकाही प्रश्नाचे जिजीने उत्तर दिले नाही, ही जाणीव त्यांना बोचते आहे. त्याचबरोबर दिल्ली-प्रकरण तिला कळले आहे, की काय, याचाही ते अंदाज घेत आहेत. ती एक क्षीण, कष्टी कटाक्ष त्यांच्यावर टाकते आणि आत जाऊ लागते. तेवढ्यात-]

शिरूभाऊ : ( काहीशा थंडपणे ) जिजी....( ती थांबते आणि वळून पाहते ) अग, तुझी कॉफी होणार आहे का ?

जिजी : तुम्ही आता दिल्लीहून आलात, की दिल्लीला निघालात ? ( शिरूभाऊ एकदम गडबडतात. ) उगाच घाईघाई. ( ती आत जाते. )

शिरूभाऊ : ( स्वतःशीच पुटपुटतात. ) या घरात मलाच तेवढी किंमत नाहीये! आपण फक्त कमवायचं... आणि सगळ्यांच्या नरड्यात ओतायचं...!

[ ते डायनिंग टेबलाकडे येऊन बसतात. अस्वस्थपणे दोन्ही हातांच्या मुठी टेबलावर आपटत राहतात. परत परत...तेवढ्यात जिजी ट्रे घेऊन येते. त्यात कॉफीची किटली – दोन कप वगैरे. ट्रे टेबलावर ठेवते. बाजूला उभी राहते. शिरूभाऊ अस्वस्थपणे टेबलावर मुठी आपटत राहतात. ]

जिजी : ( क्षणभराने ) हे पाहा...जेव्हा तेव्हा तुम्ही चिडलेला असता...
शिरूभाऊ : तुम्ही चिडण्यासारखं काही तरी करता, म्हणून चिडतो ...
जिजी : एक गोष्ट सांगितली, तर तुम्ही शांतपणे ऐकणार का ?
शिरूभाऊ : (चमकून तिच्याकडे बघत ) मला माहीत आहे. तू दिल्लीचं विचारणार. दिल्लीला सोप मॅन्युफॅक्चरर्सची कॉन्फरन्स होती.
जिजी : ते सगळं मला माहीत आहे.
शिरूभाऊ : ( गडबडतात...सावरून ) मग कशाबद्दल ?
जिजी : फडक्यांनी त्या परांजप्यांचं स्थळ सुचवलंय्...
शिरूभाऊ : कोण परांजपे ?
जिजी : ते फडक्यांना विचारा....पण आता मागं लागा... त्या कुमार साठेशी तिला लग्न करायचं होतं... तर तिला करू दिलं नाहीत.
शिरूभाऊ : तो साठे ? नुसता एसेस्सी...आणि म्युनिसिपालटीत नोकरी.
जिजी : त्याला नोकरी तरी होती! तुम्हांला काय होतं? लग्नाच्या वेळी चपला दिल्या होत्या मी. माझ्या पगारातनं....
शिरूभाऊ : ( ते न ऐकल्यासारखं करीत ) तू का नाही जात ?
जिजी : कुठं ?
शिरूभाऊ : परांजप्यांकडे ?
जिजी : मी जाते का कधी कुणाकडे ? बसायला–बोलायला ?
शिरूभाऊ : का नाही ?
जिजी : घरच्या गोष्टी निघतील, म्हणून...
शिरूभाऊ : कसल्या घरच्या गोष्टी ?
जिजी : ते सगळं तुम्हांला माहीत आहे! मला तर जगायचीसुद्धा लाज वाटते.

शिरूभाऊ : मग त्या फडक्याला घेऊन जा... बरा आहे विधुर...( ती रागाने बघते.) बायकोवर मोठ्ठं प्रेम...

जिजी : खरोखरच त्यांचं कमलावहिनीवर प्रेम होतं...

शिरूभाऊ : तुझ्यावरसुद्धा असेल...( ती जळजळीत नजरेने बघते. ) काही बघायला नको. उगाच नाहीत थालिपीठं गेलेली ! फडक्यांना आवडतात ना ? माझ्यासाठी नाही कधी केलंस !

जिजी : ( ट्रेमध्ये बशी उघडून ) नीट डोळे उघडून बघा....

शिरूभाऊ : मला नको ते थालिपीट–फडक्यासाठी केलेलं....

जिजी : ( चिडून ) मला माहीत आहे....मी तुमचं बाहेरचं विचारीन...म्हणून तुम्ही मला तंग करताय....

[ ती फणकाऱ्याने जाऊ लागते. ]

शिरूभाऊ : थांब, (ती थांबते) कॉफी कुठं आहे ?

जिजी : समोर काय आहे ?

शिरूभाऊ : कपात ओतायला हात मोडले ?

[ ती कपात कॉफी ओतते. कप त्यांच्या पुढ्यात ठेवते. ]

जिजी : ( जाता जाता ) अशानं इथं राहणंसुद्धा नको वाटतं...

शिरूभाऊ : मग जा....

जिजी : हो ! तुम्हांला सांगणं सोपं आहे. मुलांचं निमित्त करून नोकरी सोडायला लावलीत...माझ्या आईचा ब्लॉक होता, तो विकून टाकलात...

शिरूभाऊ : ( चिडून ) विकून टाकला, म्हणजे विकून खाल्ला नाही ! या जागेतच घातला आणि तुझ्याच नावावर घेतलीय् जागा...

जिजी : उपकार केलेत.

[ रागारागाने क्षणभर बघतात. तो राग व्यक्त करण्यासाठी कॉफीवर घसरतात. ]

शिरूभाऊ : ( दोन घोट कॉफी पिऊन थूः थूः करीत थुंकतात) थू ! थू ! ही साली कॉफी आहे का गोमूत्र ? ( हातातला कप खाली आपटून ) अगदी महागातली पिंटोकडली कॉफी आणली, तरी तू गरम पाण्यात शेण

कालवल्यासारखी कॉफी करतेस! (तिच्याकडे बघून ओरडतात.) गोमूत्र आहे, गोमूत्र... !

जिजी : (तेवढ्याच निकराने) मग आपली पापं शुद्ध करण्यासाठी गोमूत्र म्हणून प्या...

[त्यांना संताप अनावर होतो. तिच्या अंगावर हात टाकण्यासाठी म्हणून ते झटक्याने उठतात. पण त्यांना एकदम यदुनाथची आठवण होते. तो धावत येईल, म्हणून! ते झटक्याने उठतात. आणि त्याला हाक मारतात.]

शिरूभाऊ : ए...गाढवा....(यदुनाथ बघतो.) इकडे ये...!

यदुनाथ : (यदुनाथ शांतपणे येत) फिफ्टी एट फॉर फोर....

शिरूभाऊ : (चिडून) कानफटात देईन! ही ही, कॉफी घेऊन बघ...

यदुनाथ : (यदुनाथ किटलीतील कॉफी भराभर पितो. पितापिता) वा:! छान आहे की...! (जिजीला) जिजी...उत्तम! झकास कॉफी आहे! (हे ऐकताना शिरूभाऊ चिडतात) पिंटोकडली का?

शिरूभाऊ : मूर्ख आहेस! उगाच नाहीस चारदा नापास झालास.

यदुनाथ : तीनदा! (कॉफी पीत राहतो.)

शिरूभाऊ : म्हणे, छान आहे! गोमूत्र आहे, गोमूत्र!

यदुनाथ : (कॉफी पिता पिता) पिंटोचं का?

शिरूभाऊ : पिंटोकडील कॉफी! मी नसतो, तर ही कॉफी तुम्हांला जन्मात कधी दिसली नसती...

यदुनाथ : (कॉफी पिऊन संपवतो.) छान आहे....!

शिरूभाऊ : काय छान?

यदुनाथ : गोमूत्र...गोमूत्र ..

[त्याला मारण्यासाठी उठतात, पण तो चटकन निसटतो.]

शिरूभाऊ : (चिडून) हरामजादी माणसं! माझं...खाऊनपिऊन...माजलीत!

[किटलीतील कॉफी कपात ओतू लागतात. पण किटली पार उलटी केली, तरी कपात काही पडत नाही. कारण यदुनाथनं कॉफी पिऊन

संपवलेली आहे. ]

शिरूभाऊ : (चिडून ओरडतात) या किटलीत एक थेंब सुद्धा कॉफी नाही... (उठतात.) तुम्ही प्या, तुम्ही प्या. मी कमावून आणतो....मला कॉफी नाही.

जिजी : मग कशाला कॉफीला नावं ठेवत होता ? मला माहीत आहे, काहीतरी निमित्त काढून तुम्ही मुद्दाम घर डोक्यावर घेता...

शिरूभाऊ : आता मला उशीर होतोय्, म्हणून ! (नाहीतर काय केलं असतं, हे विचारण्यासाठी ती बघत राहते.) नाहीतर मुस्काटं फिरवली असती एकेकांची...

जिजी : (चिडून) हे बघा, उगाच ओरडू नका. आणखी एक लक्षात ठेवा... माझ्याही मनाची आता तयारी झालीय्...

शिरूभाऊ : तुला कुणाची फूस आहे, ते मला ठाऊक आहे....फडके बरा अनायासे विधुर आहे. आपल्या बायकोवर आपलं किती प्रेम होतं, ते सांगत बसणार. बायको मेली आहे, म्हणून ! ऐकणाऱ्या बाईलाही मग सिंपथी वाटू लागते...

[ जायला निघतात. ]

जिजी : हवी तर दोन मिनिटांत कॉफी आणते...

शिरूभाऊ : (ओरडतात) उकळ थोडी आणि तुझ्याच नरड्यात ओत... (खांद्यावर कोट टाकतात आणि निघून जातात.)

[ ते निघून जाईपर्यंत जिजी त्यांना एकटक बघत राहते. यदुनाथही गॅलरीतून तसाच बघत राहतो. ते उघड्या दारातून निघून जातात. यदुनाथ धावत जाऊन दरवाजा बंद करतो. आणि दरवाज्याला पाठ टेकून सुटकेचे श्वास टाकीत उभा राहतो. जिजीही आपल्या पोटाचा ॲप्रन काढून टेबलावर टाकते, आणि सुटकेचा निःश्वास सोडत कोचा-वर येऊन बसते. ]

जिजी : (स्वतःशीच) हे घराबाहेर गेले, की जिवावरच्या दुखण्यातनं बाहेर पडावं, तसं वाटतं... (यदुनाथ जवळ येतो. त्याच्याकडे बघत) वाटतं ....दुपार... संध्याकाळ, रात्र येऊच नये... येऊच नये... (ती कपाळ

चोळत राहते. मनाने खूप थकली आहे.)

यदुनाथ : (समोर बसत) डोकं दुखतंय् ? (ती डोकं चोळत राहते.) मी बाम चोळू ? (ती मानेनं नको म्हणते.) तू खूप थकली आहेस, जिजी.

जिजी : (त्याच्याकडे एकटक बघत) आरडाओरडा करून हे मला इतकं तंग करतात, की बघता बघता मला चक्कर येईल, असं वाटू लागतं. ती बामची बाटली दे जरा...

यदुनाथ : (बाटली देत) जिजी, तुला एक सांगतो... (ती बघत राहते.) भाऊंनी तुझ्यावर हात उगारला, तर पटकन त्यांचा हात पकड. काय करतात, ते बघू. मी आहे तुझ्या पाठीशी...

जिजी : (तशीच बघत) मग तू का मघाशी मुस्कटात खाल्लीस...?

यदुनाथ : जिजी....मी त्यांचा हात धरू शकलो नसतो ? त्यांचा हात पकडून पिरगाळू शकलो असतो. पण आपल्या (आवाज गहिवरतो) आपल्याच बापाचा हात... (तो एकदम हाताची मूठ डोक्यावर ठेवतो. त्याचा आवाज कातरतो.) अग, हेच आपले भाऊ आम्ही लहान होतो, तेव्हा.... (त्याच्यावर वेगळेच प्रकाश-किरण फिरतात...तो जुन्या आठवणींत रमतो.) आमचे किती लाड करायचे...माझे, श्यामाचे....

जिजी : (तीही जुन्या आठवणींत शिरते) अरे, तू झालास, तेव्हा त्यांनी आनंदाच्या भरात उड्या मारल्या होत्या. मॅटर्निटी होमचं बिल द्यायला पैसे नव्हते .. तरी सुद्धा चार-पाच किलो पेढे वाटले त्यांनी !

यदुनाथ : मला सारखे ते दिवस आठवतात. दारामागे लपायचे आणि एकदम हॉक करून अंगावर यायचे...चॉकलेट आणायचे... खेळणी आणायचे ...स्कूटर, सायकल, मोटर...ते घोडा घोडा करायचे... मी नि श्यामा त्यांच्या पाठीवर बसायचो...म्हणायचे...हाट, घोड्या, हाट, बाजाराची वाट...ते भाऊ...जिजी...जिजी...कुठं गेलेत... ? ते सगळं आठवून, जिजी, माझं कशावरच लक्ष लागत नाही.

जिजी : असं म्हणून कसं चालेल, यदू...? किती हुशार मुलगा तू...कवितासुद्धा किती सुंदर करायचास... 'सत्यकथा' मासिकात तुझ्या कविता आल्या, तर मला किती आनंद झाला होता... !

यदुनाथ : (डोळे पुसत) आता माझ्या हातून काही होणार नाही....मन इतकं सैरावैरा होतं, की आता सगळं उद्ध्वस्त करून टाकावंसं वाटतं...

जिजी : (विनवणी करीत) असं म्हणू नकोस...मी ...मी...मग मी कोणाच्या तोंडाकडे बघू.. ? फडकेकाकांच्या ब्लॉकच्या किल्ल्या तुझ्याकडे आहेत,

तिथं बस आणि अभ्यास कर...

यदुनाथ : छे ! इथं जे भाऊंचं चालतं...काय सांगू तुला...? मी माझ्या मित्रांच्या घरी जातो....पण आपल्या घरासारखं कुठंच नाही. फडकेकाकांकडे बघतो....ते रोज रात्री काकींच्या फोटोला हार घातल्याशिवाय झोपत नाहीत.

जिजी : किती सुखी, आनंदी होत्या त्या कमलावहिनी... ! कमलावहिनी म्हणजे...

यदुनाथ : रात्री झोपताना काकींच्या किती गोष्टी ते कौतुकानं सांगतात... मागे काकांचं ऑपरेशन होतं ना, तेव्हा काकी आठ दिवस नुसत्या पाण्यावर होत्या.... मग आमच्याच घरी हे असं का...? ( तसाच जायला निघतो. )

जिजी : आता जेवायच्या आधी...एवढया उन्हातान्हाचा कुठं चाललास ?....

यदुनाथ : ( दार उघडत वळून ) स्फोट होतात...डोक्यात स्फोट.... ! ( तसाच अनवाणी निघून जातो. )

जिजी : अरे, चप्पल तरी घाल पायांत...

[ पण तो ते न ऐकता धाडकन दरवाजा मिटून निघून जातो. ती खिन्न डोळ्यांनी त्याला बघत असताना काळोख होतो.]

## दृश्य दुसरे

[ तेच घर. काही दिवसांनंतर. वेळ सायंकाळची. गॅलरीत यदुनाथ उभा आहे. त्यांचे मित्र खालून– रस्त्यावरून शिट्या मारतात. त्यांना बघून यदुनाथही तोंडात बोट घालून दोन शिट्या मारतो. तेवढ्यात दारावरची बेल वाजते. मित्रांना टाटा करून यदुनाथ दार उघडतो. दारात फडके. त्यांच्या हातात पिशवी.]

फडके : ( आत येत ) तू घरी कसा काय ?

यदुनाथ : का ?

फडके : ड्यूटीवर गेला नाहीस ?

यदुनाथ : कुठं ?

फडके : महालक्ष्मीला जुगारी अड्ड्यावर जातोस, म्हणे...

यदुनाथ : कोणी सांगितलं ?

फडके : कोणी का सांगेना..

यदुनाथ : मला टाऊक आहे. भाऊंनी सांगितलं असणार....

फडके : ( रागावून ) पण जातोस ना त्या अड्ड्यावर...?
यदुनाथ : तो सोशल क्लब आहे, काका !
फडके : इंग्लिश नावं दिली, तरी तो अड्डाच ना !
यदुनाथ : तिथं भाऊंच्या सारखे लोक येतात. भाऊ स्वतः आले होते. बरोबर कोण होती, माहीत आहे...?
फडके : वडिलांबद्दल आपण असं बोलू नये...
यदुनाथ : वडील ! ( कडवट हसतो ) टेबलापाशी मला बघताच मागल्या मागं पळाले.
फडके : अरे, पण तू या लोकांत एकदा अडकलास ना...?
यदुनाथ : त्या लोकांचा आधार आहे मला, काका....
फडके : ( चमकून ) आधार ? एवढा रस्त्यावर पडला आहेस ?
यदुनाथ : भाऊंवर वचक ठेवण्यासाठी जाता-येताना ते शिट्या मारतात. भाऊ ते ओळखून आहेत. त्यामुळं हल्ली ते हात उगारीत नाहीत. विशेषतः जिजीवर....
फडके : मी शिरूभाऊंना बजावून ठेवतो. पण तू त्या अड्ड्यातनं बाहेर पड.

[ तेवढ्यात श्यामा आतून बाहेर येते. तेवीस वर्षांची. घरातल्या वातावरणामुळं आहे त्यापेक्षा मोठी दिसणारी. ]

फडके : श्यामा, आज ऑफिसातनं लवकर आलीस, की काय ?
श्यामा : नाही, आत्ताच आले.
फडके : जिजी कुठं बाहेर गेल्यात ?
श्यामा : नाही, आहे घरात ! ( हाक मारीत ) जिजी, जिजी...फडकेकाका आलेत.

[ तेवढ्यात खालून एक शिटी ऐकू येते. यदुनाथ पटकन गॅलरीत जाऊन हात वर करून बघतो. फडके हे सर्व वळून बघतात. ]

फडके : ( श्यामाला ) कुठं बाहेर निघालीस ?
श्यामा : जवळच...लायब्ररीत....बाजारात...

[ जिजी बाहेर जाण्याच्या तयारीत आहे...हातात पर्स, बास्केट. ]

फडके : ( हातातली पिशवी श्यामाकडे देत ) आत ठेव. घरची वांगी आहेत.

नीताकडची. ( श्यामा पिशवी जिजीकडे देते. )

जिजी : तुम्ही गेला होतात भिवंडीला ?

फडके : नाही ! तिचा गडी आला होता.

जिजी : ( पिशवी उघडून बघत ) छान आहेत वांगी....( पिशवी डायनिंग टेबलावर ठेवीत ) भरली वांगी करायला.... ( आठवत ) भरली वांगी खावीत कमलावहिनींच्या हातची.

फडके : नीता आमची नेहमी आठवण काढते. स्वतः करतेही ! पण ती नेहमी आईची सर नाही, म्हणते.

जिजी : कमलावहिनींचा हातगुणच वेगळा. त्या गेल्यानंतर....आम्ही सुरळीवड्या खाल्लेल्या नाहीत.

[ ऐकता ऐकता फडके कातर होतात... जायला निघतात. ]

फडके : येतो मी. तुम्ही बाहेर निघालात ? ( वळतात. )

जिजी : जवळच बाजारात... ( ते जाता जाता ) आजही परांजप्यांकडे गेला नाहीत ? हे आले नसतील...!

फडके : आले होते ! गेलो होतो आम्ही.

जिजी : ( उत्सुकतेने ) काय झालं...?

फडके : तिथं जुळण्यासारखं नाही...

जिजी : का ?

फडके : ( एकदम गोंधळून ) बहुतेक पत्रिका.

जिजी : ते पत्रिका बघणार नव्हते ना ?

फडके : ( गडबडून ) तरीसुद्धा . ( अडखळतात. )

जिजी : फडकेकाका, काय असेल, ते सांगा. आम्हांला आता सगळं ऐकायची सवय झाली आहे. ( श्यामाने तिथून आत जावे, म्हणून ते श्यामाकडे बघतात. ) काही हरकत नाही...तिनं ऐकलं, तरी....

[ श्यामा जड पावलांनी आपल्या खोलीकडे जाते. ]

फडके : खरं म्हणजे, जिजी, मी तुम्हांला हे सांगू नये....शिरूभाऊंनी मला शपथ घातली आहे.

जिजी : असू दे ! मी त्यांना सांगणार नाही.

[ तेवढ्यात श्यामाच्या खोलीच्या दारातून श्यामाचा हात दिसतो. कुतूहलाने ऐकत....ती तिच्या नकळत पुढे येते. ]

फडके : ( घाबरत, अडखळत ) छे ! कसं सांगायचं ? अहो जिजी, बरं तर बरं. त्या परांजप्यांची तगडी पोरं... त्यांनी आमची तोंडं फोडली असती....

जिजी : का पण ? हे काही बोलले ?

फडके : ( अवघडत ) परांजप्यांच्या बायकोची धाकटी भावजय....ती कोण... शैला काळे ...यांनी आपल्या नादी...

जिजी : हो ! ती ह्यांच्या फॅक्टरीत आहे...

फडके : छेः ( स्वतःशीच विनोदाने ) ह्या शिरूभाऊंच्या फॅक्टऱ्या ?

[ एकदम मान वर करून जिजीकडे बघतात...तिला हे आवडलेलं नाही, हे त्यांच्या लक्षात येते. ]

फडके : सॉरी ! तुम्ही आता विचार करू नका, जिजी. मी तिथनं निघाल्यावर शिरूभाऊंची खरडपट्टी काढली. आता त्यांनी सुधारण्याचं वचन दिलंय् ..

जिजी : ( स्वतःशीच ) वचन ! ( थांबून ) हे आता गेलेत, कुठं ?

फडके : क्लबवर दोन डाव टाकून येतो, म्हणालेत. ( थांबून ) तुम्ही चला...

जिजी : चल, ग, श्यामा...( श्यामा येते. )

फडके : आणि तुम्ही चिंता करू नका. मी स्थळांच्या शोधात आहे.

[ जायला वळतात, तोच यदुनाथ गॅलरीत दिसतो. ]

जिजी : ( बाहेर जाता जाता ) याला काहीतरी सांगा. दिवसभर घराबाहेर असतो.

फडके : यदू...( यदुनाथ जवळ येत असताना जिजी आणि श्यामा बाहेर जातात. दरवाजा उघडाच आहे. ) तू त्या अड्ड्यातून ताबडतोब बाहेर पड.

यदुनाथ : तिथं वेळ बरा जातो, काका !

फडके : मुस्कटात देईन ! आपल्यासारख्यांची जागा आहे का ती ?

यदुनाथ : काय करू, काका ? इथं बसलो, तर....

फडके : माझ्या घरी बस.

यदुनाथ : मनात विचार येत राहतात. ( रडकुंडीला येतो. ) इथं घरी पार्ट्या

होतात, तेव्हा त्यांच्या मित्रांच्या पुढ्यात, मित्रांच्या बायकांच्या पुढ्यात भाऊ जिजीचा अपमान करतात...तिनं केलेल्या जेवणाला नावं ठेवतात. तिच्यावर वाईट विनोद करतात. तिची टिंगल करतात... (चिडून) आणि ती निर्लज्ज अश्लील माणसं खदाखदा हसतात...व्हीडिओवर ब्ल्यू फिल्म्स दाखवतात, आणि त्या बघण्याची जिजीवर सक्ती करतात. काका, जिजी आत जाते, तेव्हा चोरून रडते. बाहेर येते, तेव्हा हसते....का !....तिनं हे का म्हणून सहन करावं...? (डोळे पुसते.) पैशाचा माज...आता होऊ दे पार्टी...माझी माणसं आणतो आणि झोडपतो एकेकांना....

[ऐकून फडके अवाक् होतात. यदुनाथ दुःखभराने रडू लागतो. फडके त्याला जवळ घेतात आणि मायेने कुरवाळू लागतात.]

यदुनाथ : (डोळे पुसता पुसता) असं कधी हल्ली भाऊंनी घेतलंय् मला जवळ....?

[तेवढ्यात घाईघाईने आणि घाबऱ्या घाबऱ्या होऊन जिजी आणि श्यामा उघड्या दारातून आत येतात.]

जिजी : ते येताहेत...
फडके : कोण...?
श्यामा : भाऊ !
फडके : येऊ देत.
जिजी : त्यांना संशय येणार....तुम्ही सगळं सांगितलं, की काय, म्हणून...!
फडके : (एकदम घाबरून) हो, हो ! मी पळतो. (पळ काढता काढता) त्यांना सांगू नका, मी काय सांगितलं, ते...(जातात.)

[जिजी डायनिंग टेबलाशी डोकं चोळीत बसते. श्यामा अस्वस्थ होऊन आपल्या खोलीपाशी उभी. यदुनाथ गॅलरीत...तिथलाच कोपऱ्यातला बांबूचा एक हातभर लांबीचा तुकडा घेऊन तो पिसेपर्यन्त गॅलरीच्या कठड्यावर मारीत राहतो....रागारागाने....कुणालातरी मारझोड केल्या-प्रमाणे, तेवढ्यात शिरूभाऊ येतात. त्यांनी आधीच टाय् काढलेली आहे. कोट हातावर घेतला आहे. आल्याबरोबर ते घरात उत्साहाने आणि आनंदी चेहऱ्याने पाहतात. ते तिघेही काहीतरी नवीनच घडत

क्र. 22349 दि. 3.13.88



असल्याच्या जाणिवेने शिरूभाऊंकडे पाहतात. आणि मग चक्रावून एकमेकांकडे पाहतात. हे काय चालले आहे, तेच त्यांना कळत नाही. पण श्यामा हळवी असल्यामुळे ती भारावून जाते. जिजीला चढ-उतारांची सवय आहे. यदुनाथ तर चिडलेलाच आहे. तरीही शिरूभाऊ आज एकदम आनंदी मूडमध्ये आहेत. ]

शिरूभाऊ : ( जिजी डोके धरून बसलेली पाहून ) जिजी, आपल्याला डोकं आहे, हे दुसऱ्याला दाखविण्यासाठी ते हातांत धरून बसायला पाहिजे, असं नाही.

[ स्वतः मोठ्याने हसतात...हसता हसता इतरांकडे पाहतात फक्त श्यामा एकटी थोडेसे हसण्याचा प्रयत्न करते. जिजीची मान खालीच आहे. यदुनाथ मारक्या नजरेने बघतो आहे. त्याच्या जवळ जात-]

शिरूभाऊ : यदुनाथजी, अभ्यास जोरात चाललाय् ना ? हे पाहा... परीक्षेत नापास होणं हे काही कमीपणाचं नाही...! तुझा बापसुद्धा मॅट्रिक नापासच आहे...तो सुद्धा दोनदा. ( जिजी टवकारून त्यांच्याकडे पाहते. ) अरे, बी. ए., एम्. ए. होणारी माणसं... ( जिजीकडे गमतीने पाहतात. ) तशी दुर्मिळच. अरे, हा अर्धा देशच मुळी अशिक्षित, आणि उरलेला अर्धा कुठं ना कुठं नापास होणारा. ( त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला जवळ घेण्याचा प्रयत्न करतात; पण तो दूर होतो. ) तू नुसता पास हो ! तुला अमेरिकेला पाठवतो, की नाही, बघ ! ( परत मागे येतात. श्यामाकडे बघतात. ) श्यामा, तू चिंता करू नकोस.

श्यामा : ( आनंदाने गांगरून ) कसली चिंता, भाऊ ?

शिरूभाऊ : अग, चिंता लग्नाची....

श्यामा : इश्श....( लाजून तोंड झाकते. ) काहीतरीच काय, भाऊ...!

शिरूभाऊ : अग, मी तुला राजबिंडा नवरा आणतो, की नाही....नुसती बघतच राहा ! झक मारतो तो परांजप्याचा बावळट पोरगा ! मी त्याला तिथल्या तिथं डिस्मिस् केला. यूसलेस् ! मी आता त्याच कामाला लागणार आहे. माझ्या आता लक्षात आलंय्...या धंद्यामुळं....करिअरमुळं. वेळ फार जातो...मीटिंग्ज...पार्ट्या...क्लबलाईफ...इनफ् ऑफ इट् ! यापुढं फॅमिलीलाईफ...साडेसहापर्यन्त रोज घरी...तुमच्याशी गप्पा-गोष्टी... तुझं लग्न...याचं शिक्षण....सिनेमा...नाटक...( जिजीला ) जिजे....

आज जायचं का नाटकाला ? हिट ॲण्ड हॉट ? ( आपणच हसतात. )

श्यामा : ( आनंदाने ) भाऊ, तुम्हांला आईस्क्रीम-कॉफी आणू का ?

शिरूभाऊ : अग, आईस्क्रीम केलेलं नसणार! ( जिजी एकदम फणकाऱ्याने पाहते. )

श्यामा : केलंय् आज जिजीनं....

शिरूभाऊ : ( लाडाने ) पण ते तुझ्यासाठी, की माझ्यासाठी ?

श्यामा : तुमच्यासाठी, भाऊ....

शिरूभाऊ : अग, ही काय आईस्क्रीम खाण्याची किंवा कॉफी पिण्याची वेळ आहे...?

[ तिच्या कपाळाचा मुका घेतात. ]

श्यामा : भाऊ, आज नका ना ते ड्रिंक घेऊ...

शिरूभाऊ : अग, आजची सायंकाळ म्हणजे...मी आनंदी मूडमध्ये आहे....

श्यामा : नको, भाऊ, आज. मी सांगते म्हणून...मग तुम्ही सगळ्यांचाच मूड घालवता...स्वतःच आणि इतरांचा....

शिरूभाऊ : नो नो ! श्यामा, आय प्रॉमिस...फक्त दोन....फक्त दोन पेग्ज !

श्यामा : बरा हं, भाऊ....

शिरूभाऊ : श्यामाऽ ( ती धावत आत जाते. प्रेमाने जिजीला ) जिजी... हे बघ, तुझ्यासाठी काय आणलंय् , ते...(दाखवतात. ती बघते...ओल्ड स्पाईस ओ डी कोलनची बाटली...) ओल्ड स्पाईस ओ डी कोलन....सगळी बाटली आंघोळीच्या पाण्यात घाल... आणि आंघोळ कर... स्वच्छशी... तो अमृतांजनाचा चिकट दर्प घालव... आय् ॲम इन ज्युबिलंट मूड टुडे !

[ तेवढयात श्यामा ट्रे घेऊन येते. स्कॉचची बाटली. पाण्याची बाटली. बर्फाचे भांडे. दोन-तीन ग्लास. दोन बश्यांत काहीतरी खायला... दाणे, वेफर्स वगैरे ]

शिरूभाऊ : (आनंदाने) गुड गर्ल, स्वीटी.... ! एनिबडी वॉण्टिंग टु जॉईन ? ए जिजे..., ए स्मॉल वन्...? (ती नाराजीने वर बघते. आणि पुन्हा खाली मान घालते.) थोडी वाईन घे....जिजी...

श्यामा : जिजी, तू घे ना थोडी वाईन....कंपनी म्हणून...

जिजी : मला काही नको....

शिरूभाऊ : (तिच्या जवळ जात) का ? पूर्वी घेत नव्हतीस...?

जिजी : पूर्वीचे दिवस वेगळे होते. तेव्हा आपण एकमेकांचे होतो...

शिरूभाऊ : आणि आता ?
जिजी : आता आपलं कसलं नातं आहे, तेच मला कळत नाहीये.
शिरूभाऊ : जिजी, तू भलतंसलतं बोलून मला चिडवू नकोस.
श्यामा : (किंचित हसून) जिजी, आता पुरे ना हे तुझं...असू दे ते....
जिजी : (श्यामाला चिडून) काय... काय असू दे ? आपला नवरा आपला वाटायला पाहिजे. मला ते खोटं हसून देखावे करता येत नाहीत... आपला नवरा....
शिरूभाऊ : आता कुणाचा आहे ?
जिजी : रोझी फर्नांडीसचा तर आहेच ... आणखी ... शिवाय...
शिरूभाऊ : (चिडून) तू रोझीचं नाव घेऊ नकोस. तुला ठाऊक आहे, ती माझी सेक्रेटरी आहे. तिचा नवरा माझ्याकडेच केमिस्ट आहे....
जिजी : तो मेला बावळट ! नेभळट म्हणून सगळं चालू देतो....गावात आपली आणि आपल्या कुटुंबाची काय शोभा होते...
शिरूभाऊ : ( चिडून ) त्याची काय शोभा होते, ते त्याचं तो बघेल... रोझीचा नवरा...
जिजी : मी त्याचं म्हणत नाही...मी तुमच्याबद्दल म्हणतेय्...
शिरूभाऊ : माझी काहीएक शोभा होत नाहीय्.
जिजी : तुमची नाही. आमची शोभा होतेय्.
श्यामा : जिजी, मी तुझ्या पाया पडू का ? पुरे आता...
शिरूभाऊ : तुला मी, जिजी, हज्जारदा सांगत आलोय्...माझ्यासारख्या अप्कमिंग, अॅम्बिशियस मॅनेजमेन्ट एक्सपर्टला थोडं सोशल लाईफ हवंच.
जिजी : (चिडून) मग ते त्या परांजप्यांच्या घरी सांगायचं...
शिरूभाऊ : (एकदम दचकतात.) परांजप्यांच्या घरी काय...?
जिजी : परांजप्यांच्या भावजयीचं...ती ..कोण ती...शैला काळे...!
शिरूभाऊ : (ओशाळून) तुला कुणी सांगितलं....?
जिजी : मला कुणीही सांगितलेलं नाही....( आपण बोलण्यात चूक केली, हे तिला कळतं. )
शिरूभाऊ : फडके आले होते ?

[ श्यामा, यदुनाथ गडबडून 'टेन्स' होतात. शिरूभाऊंचे लक्ष टेबलावरच्या पिशवीकडे जाते. ]

जिजी : फडकेकाका आले नव्हते.

शिरूभाऊ : (चिडून टेबलावर मूठ आपटतात) ही भिवंडीची वांगी... फडके आले नव्हते...? मी यायच्याआधी हा तुझा फडक्या इथं येऊन गेला! त्याची काढतो भोसटपट्टी...तो परत परत इथं का येतो, ते लक्षात आलंय् माझ्या.

जिजी : त्यांना तुम्ही विचारू नका....त्यांनी काहीही सांगितलेलं नाही.

[ हे ती जीव तोडून सांगत असताना ते फडके यांना ' साला हरामखोर, डामरट...रास्कल ! ' असे शिव्याशाप देत तावातावाने बाहेर जातात. दरवाज्याच्या पलीकडे ते फडक्यांचा दरवाजा ठोकतात. आणि नंतर थोडी बाचाबाची होते. ती ऐकू येते. ती ऐकून जिजी कमालीची अस्वस्थ होते. पिवळी फिक्कट पडते. सोफ्याचा अधिक आधार घेऊन उभी राहते... कपाळ कणकणते, म्हणून कपाळाची पट्टी चोळते. श्यामा, यदुनाथ घाबरल्यासारखे होतात ... दरवाज्याबाहेर बघत राहतात ... तेवढ्यात शिरूभाऊ तावातावाने येतात .... पाटोपाठ फडके येतात ... ते घरगुती वेशात आहेत. ]

शिरूभाऊ : (आत येत रागारागाने) आणि तुम्ही मोठे आमचे मित्र म्हणवता ... मित्र....मोठ्या विश्वासानं मी तुम्हांला बरोबर घेतलं...

फडके : (गडबडलेले आहेत) पण, शिरूभाऊ, मी बोलल्ो नाही.

शिरूभाऊ : (चिडून) वर आणखी खोटं बोलू नका...तुम्ही सांगितल्याशिवाय हिला कसं कळलं ?

फडके : काय कळलं ?

शिरूभाऊ : परांजप्यांकडं...! म्हणून मी परत परत बजावून सांगितलं तुम्हांला... की इथं येऊन हे बोलू नका...

फडके : (गयावया करीत) तुम्हीही, जिजी, कमाल करता....! (काय–अर्थी ती बघते.) तुम्हांला मी परत परत बजावून सांगितलं होतं, की मी हे सांगितलं, म्हणून इथं सांगू नका...

जिजी : मीही यांना परत परत बजावून सांगितलं.

फडके : मी सांगितलं, हे सांगू नका, म्हणून ? (डोक्यावर हात मारून घेतात.)

जिजी : यांचं हे असंच आहे. घर डोक्यावर घ्यायचं आणि सगळ्यांना टेन्स करायचं...

शिरूभाऊ : असू दे...

फडके : (काहीसे हसत) म्हणजे आमचं आपलं उगाच मधल्यामधे सॅण्डवीच !

मदतीला आलो, त्याचं चीज नाही...

शिरूभाऊ : आता चीज-सॅण्डवीच करा आणि खा...जा झोपा.

[ फडके कपाळाला हात लावीत किंचित हसत निघून जातात. दरवाजा बंद. ]

शिरूभाऊ : खरं म्हणजे याला या फडक्याला इथं यायची बंदीच केली पाहिजे. याच्यामुळंच, जिजी, तू शेफारली आहेस. सालं, फालतू फडकं...!

जिजी : असा आरडाओरडा करून तुम्हांला मूळ प्रश्नाला बगल द्यायची सवयच आहे.

शिरूभाऊ : मूळ प्रश्न काय आहे ?

जिजी : तुमच्यापुढं कुठलाच प्रश्न नाहीये ! प्रश्न आहेत ते माझ्यापुढं !

शिरूभाऊ : कसले प्रश्न, जिजी ?

जिजी : श्यामाच्या लग्नाचं ! मुलीच्या बापाची ही ख्याती म्हटली, म्हणजे.... कोण मुलगी घरात घेईल ? जावं, तिथं परत यावं लागतं...निमित्त पत्रिकेचं सांगतात.

शिरूभाऊ : ते मी जुळवतो. ( प्यायला बसतात. )

जिजी : जुळवा ! ( बाहेर जायला निघत ) चल, ग, श्यामा...

शिरूभाऊ : ( आश्चर्याने ) आता कुठं चाललात ? बसा...बसा...खूप दिवसांनी...

श्यामा : बसू या, ग...जिजी....

जिजी : तू बस...पाहिजे, तर...

[ शिरूभाऊ श्यामाला हाताने बसायला सांगतात. जिजी फणकाऱ्याने पिशवी उचलते आणि जाते. जाता जाता एक दुखरा कटाक्ष श्यामावर टाकते. श्यामाच्या लक्षात येतं....शिरूभाऊ तिच्याकडे अपेक्षेने बघत असताना ती पटकन जिजीबरोबर निघून जाते.
शिरूभाऊ बाटली उघडता उघडता अपेक्षेने यदुनाथकडे पाहतात... त्यांना सोबत हवी आहे. यदुनाथ भेदरलेला आहे. ते त्याला हाताने जवळ बोलावतात. पण तो जवळ येत नाही. उलट बाहेर पळण्यासाठी चुळबुळ करतो. ]

शिरूभाऊ : ( प्रेमळपणे ) यदू, इकडे ये...थोडा वेळ गप्पा मारू...( व्हिस्की ग्लासात ओतत ) तुझे काही प्रॉब्लेम्स...

[ वळून बघतात....तो पळ काढतो. ते नाराजीने मान हलवीत पिऊ लागतात. करुण आणि मन उदास करणारे सूर.... ते पश्चात्तापदग्ध मनाने विचार करीत राहतात. वर बघत सिगारेट ओढतात. पुन्हा पितात. उठतात. दरवाजा उघडतात आणि दरवाज्यातून हाका मारतात.]

शिरूभाऊ : फडके, अहो फडके....( दुरून फडकेचा आवाज. ) या या ... ( फडके येतात ) या या...बसा...थोडी कंपनी द्या...

फडके : आमची कसली कंपनी ? आम्ही सरबतवाले...

शिरूभाऊ : सरबतवाले का ? मागे एकदा प्यायला होतात तुम्ही व्हिस्की....

फडके : कधी ? छे छे !

शिरूभाऊ : गेल्या वर्षी ! माझ्या वाढदिवसाला पार्टी झाली होती, तेव्हा ?

फडके : ( हसतात ) तेव्हा प्यालो, म्हणजे काय ? तुमचा वाढदिवस होता आणि जिजींचाही आग्रह. ( शिरूभाऊ एकदम रोखून त्याच्याकडे पाहतात. ) पण त्रास झाला.

शिरूभाऊ : आज घ्या. अ स्मॉल वन्...

फडके : नको ! मुळीच नको ! अशानंच मग सवय होते. प्लीज...

शिरूभाऊ : मग तुम्हांला सरबत देतो. ( आत जातात. )

फडके : घरी कुणी नाहीत वाटतं...?

शिरूभाऊ : ( सरबताची बाटली घेऊन बाहेर येतात. ) सगळी बाहेर गेलीत. ( थांबून ) यदू तुमच्याकडे बसलाय् का ?

फडके : हो !

शिरूभाऊ : ( सरबत ओतत ) बघा, मी त्याला बोलावला. म्हटलं लेट् अस् डिस्कस युवर प्रॉब्लेम्स...तर पळून गेला. श्यामासुद्धा ! गप्पा मारू म्हटलं, तर थांबली नाही. ( सरबत देतात ) आमचं काय स्थान आहे या घरात ?

फडके : दोष त्यांचा म्हणता ?

शिरूभाऊ : कुणाचा ?

फडके : मुलांचा ?

शिरूभाऊ : चीअर्स ! ( घोट पिऊ लागतात ) नाही ? त्यांचा दोष नाही ?

फडके : ( सरबत पीत ) मघाशी काही गोष्टी समजावण्यासाठी मी यदुनाथला जवळ घेतला, तेव्हा तो काय म्हणाला, माहीत आहे ?

शिरूभाऊ : काय ?

फडके : भाऊ कधी मला असं जवळ घेत नाहीत ..

शिरूभाऊ : ( विस्मयाने ) असं तो...असं यदुनाथ म्हणाला, फडके ? डॅम इट् !

(डाव्या हातावर उजव्या हाताची मूठ आपटतात) हे आपल्या लक्षातच येत नाही. आपल्या फास्ट लाईफमध्ये आपण खूप पुढं जातो... आणि बायको...आणि विशेषतः आपली मुलं फार मागं राहतात...नाही ?

फडके : आणि ती पोरकी होतात....शिरूभाऊ !

शिरूभाऊ : (पितात. खाद्यपदार्थ देत) हे घ्या...खा !

फडके : सरबत तुम्ही केलं ?

शिरूभाऊ : छे ! जिजी करून ठेवते बाटलीभर...

फडके : सुरेख केलंय्... जिजींचं करणं म्हणजे आमच्या कमलसारखं. एकेकाच्या हाताचाच गुण असतो. आणि मनाचाही...अशा बायकांना मनातनं वाटत असतं...आपल्या हातचं दुसऱ्यानं खावं.. ! जिजींच्या हातची थालिपीठं...मसाल्याचं वांगं ...

शिरूभाऊ : म्हणूनच आज भिवंडीहून वांगी आणलीत ?

फडके : (हसत) उद्या जिजींच्या हातचं मसाला वांगं आणि बाजरीची भाकरी ! एक दिवस सुटला....खाणावळीतला...

शिरूभाऊ : खा खा...पण ती भाऊबीज वाढवा. वर्षोन् वर्षं दहा रुपये.

फडके : पंचवीस ! पंचवीस देतो. (थांबून) शिरूभाऊ, एक गोष्ट बोलू का ? विषय निघालाय्, म्हणून...

शिरूभाऊ : बोला बोला...(पितात)

फडके : तुम्हांला राग येईल...

शिरूभाऊ : पिताना राग कुठला ? (ग्लास वर करीत) चीअर्स.... !

फडके : शिरूभाऊ, तुम्ही आपल्या मुलांना, जिजींना अधिक चांगलं वागवलं पाहिजे.

शिरूभाऊ : मी चांगलं वागवत नाही ? त्यांना इथं काय कमी आहे ?

फडके : नको ते खूप आहे. हवं ते कमी आहे. शिरूभाऊ, आज मी हे बोलतोय्, म्हणजे कमलची इच्छा पुरी करतोय्. ती मला नेहमी सांगायची, तुम्ही हे शिरूभाऊंशी बोला. तुम्ही, शिरूभाऊ, एकमेकांना समजून घ्यायला पाहिजे. आय् नो...हे सांगणं सोपं असतं...

शिरूभाऊ : (हसत) आणि दुसऱ्यानं तिसऱ्याला सांगणं तर फारच सोपं ! आणि तुम्हांला वाटतं....किंवा कमलावहिनींना वाटायची....तशी जिजी काही कमी नाही...तिला कमी समजू नका !

फडके : पण तुमचा प्रेमविवाह ना ?

शिरूभाऊ : तसा प्रेमविवाह नाही. अहो, लग्नाचं वय होऊन गेलं. तरी माझं कुठं बस्तानच बसत नव्हतं. त्यामुळं मला मुलीच सांगून येत नव्हत्या. म्हणून

मीच हिच्यामागं लागलो. हिला नोकरी होती...राहायला हिच्या आईचं घर होतं....तशी ही माझ्यापेक्षा तीन-चार वर्षांनी मोठी. तरीही तयार झाली. तिचंही लग्न होत नव्हतं. तिच्या घरी स्थळं शोधायला पुरुषच नाही. (हसत) ॲक्च्युअली आमचं लग्न झालं, तेव्हा चपलांपासून टोपीपर्यंत सगळं तिनंच मला घेऊन दिलं होतं...(हसत)

फडके : हा तिचा मोठेपणा नाही ?

शिरूभाऊ : मोठेपणा ! जेव्हा तेव्हा त्या चपलेचं काढणार ! तोंडात चप्पल मारल्यासारखं ... (दोघेही हसतात. पितात) पण एक सांगतो, फडके, तो एक काळ तसा सुखाचा होता....मी धडपड करून काहीतरी मिळवीत होतो. जिजी नोकरी करीत होती. मुलं वाढत होती. त्या वेळी आतासारखा पैसा हाती नव्हता. पण सुख होतं. आज आठवण झाली, की ते एक स्वप्न पडलं होतं....असं वाटतं.

फडके : ते खरं कौटुंबिक जीवन ! तुम्हांला माहीत आहे, शिरूभाऊ ? जगात आजवर अनेक तऱ्हेच्या क्रांत्या झाल्या; पण कुठल्याही क्रांतीनं कुटुंब-व्यवस्था मोडीत काढली नाही. का ? कुटुंबावरच समाजाची धारणा आहे. तुम्ही तुमची मुलं कोणत्या संस्कारांत वाढवता, त्यावर समाजाचं मोठेपण ठरतं.

शिरूभाऊ : (एकदम डोळे विस्फारून) फडके, आय् ॲम रिअली सरप्राईज्ड ! तुमच्या विद्वत्तेचा माणूस पोस्टात ?

फडके : वाचलेलं ! (खातात) पण हे पटण्यासारखं आहे, की नाही ?

शिरूभाऊ : पटलं ! (पितात) आता मी ठरवलंय् ... (पितात)

फडके : काय ? प्यायचं नाही ?

शिरूभाऊ : नाही ! संध्याकाळी साडेसहाला नेमानं घरी यायचं आणि फॅमिलीबरोबर राहायचं !

फडके : म्हणता काय ? आणि मग ते शालिमार हॉटेल....आणि ते...

शिरूभाऊ : (आठवत) यदूनं त्या दिवशी मला खरोखरच फॉलो केलं ?

फडके : त्याशिवाय आम्हांला कसं कळणार ? महालक्ष्मीच्या सोशल क्लबमध्ये सुद्धा...

शिरूभाऊ : हा गाढव जातो.

फडके : कारण ह्या गाढवाचा गाढव बापसुद्धा जातो

शिरूभाऊ : (पटकन पितात) डन् !...फडके, ठरवलं ! डिसिजन इज टेकन् ! ते सारं बंद !

फडके : गुड् ! व्हेरी गुड ! ! हे ऐकून मला फार आनंद झाला...शिरूभाऊ....

शिरूभाऊ : फडके, जेव्हा मी लग्न केलं, तेव्हा मीही कोणी नव्हतो. आणि जिजीही कोणी नव्हती. आज मी अशा पोझिशनला आहे, की माझ्याभोवती सुंदर, देखण्या, आकर्षक स्त्रिया असतात....खर्च करायला पैसा असतो. त्यांतल्या मला सहज मिळू शकतात. नाऊ आय् हॅव अ चॉईस! आज मी खूप वरच्या पोझिशनला आहे. जिजी मात्र त्याच जुन्या पोझिशनला आहे. कदाचित अधिक वाईट पोझिशनला...

फडके : वाईट का?

शिरूभाऊ : कारण आज मला आकर्षित करण्यासारखं तिच्याकडे काही नाही.

फडके : प्रेम...?

शिरूभाऊ : (पीत) मला प्रेम आणि शरीरसुख यांत कधीच फरक करता आला नाही. तुम्हांला करता आला, फडके? मुखवटा काढून सांगा.

फडके : (थांबतात...बोलू, की नको बोलू, अशी अवस्था) मी थोडी पिऊ का?

शिरूभाऊ : प्या प्या...

[दुसऱ्या ग्लासात मद्य ओततात...फडके एका घोटात सगळा ग्लास संपवतात.]

शिरूभाऊ : अरे अरे...हळूहळू...काय हे, फडके? ते सरबत नव्हे....

फडके : ते डोक्यात गेलं पाहिजे. (उभे राहतात .... तोल जाऊ लागतो.) तुम्ही काय मला विचारलंत?

शिरूभाऊ : प्रेम आणि शरीरसुख यांत तुम्हांला कधी फरक करता आला?

फडके : मला करता आला! म्हणूनच मी आयुष्यात उभा राहू शकलो! (उभ्या उभ्या तोल जातो.) शरीरसुखातून प्रेम निर्माण होतं, हे खरं...तरीसुद्धा प्रेम हे कितीतरी मोठं कितीतरी मोठं... ते कमलनं मला शिकवलं. शरीरसुख देण्यात ... घेण्यात मी नेहमीच उणा पडलो. तिची सुरुवात, तिथं आम्ही संपलेलो... पण, शिरूभाऊ, तुम्ही फिरता, तशी ती फिरली असती, तर आज माझं काय झालं असतं? माझ्या नीताचं काय झालं असतं? प्रेमानं तिनं कुटुंब सावरलं....

शिरूभाऊ : मला, फडके, हे कधी कळलं नाही.

फडके : कारण तुम्हांला बायको आणि बायका यांतला फरक कळला नाही.

शिरूभाऊ : (स्वतःशीच) मी मागं लागलो... आठवड्या–पंधरवड्याला कुणीतरी नवीन बाई गाठणं...त्यातलं... फडके, मला धुंद करतं

फडके : थ्रिल... धुंदी सर्वांनाच हवी असते. आम्हांलाही नको असते, असं नाही.

बट् ॲट व्हॉट कॉस्ट? त्यासाठी आपण केवढी किंमत मोजायची?

शिरूभाऊ : यू आर् डॅम राईट....फडके, मी आता नवी वाट धरणार आहे. इनफ् ऑफ इट्! निदान मुलांसाठी तरी... (एकदम जुन्या स्वप्नात जातात.) त्या काळात यदू माझ्या पाठीवर बसायचा....मी घोडा घोडा ... श्यामा गाणं म्हणायची....हाट्, घोड्या, हाट्... (एकदम हसतात.)

फडके : (मद्याच्या नशेमुळे) हाट्, घोड्या, हाट् ...बाजाराची वाट ... (तेच तेच परत परत म्हणतात.)

शिरूभाऊ : (मद्याच्या नशेमुळे रांगू लागतात .... घोडा होतात.) हाट्, घोड्या, हाट्. बाजाराची वाट...हाट्,घोड्या, हाट् ....हाट्, घोड्या, हाट्.... (दोघेही एकाच वेळी म्हणतात...शिरूभाऊ, पाठीवर यदू बसला आहे, असा समज करून घेतात...पाठीकडे बघत.) यदू...

शिरूभाऊ : यदू...पुढचं म्हण ना...

फडके : हाट्, घोड्या, हाट्....

[ तेवढ्यात लॅच–कीने दरवाजा उघडून श्यामा, जिजी आणि यदुनाथ येतात. ]

श्यामा : (आनंदाने) भाऊ, तुम्ही घोडा घोडा...

शिरूभाऊ : श्यामा, यदू, माझ्या पाठीवर बसा...पाठीवर बसा माझ्या...

फडके : हाट्, घोड्या, हाट्....

[ श्यामाला खूप आनंद होतो जिजी आणि यदुनाथसुद्धा दोघांचे कौतुक-मिश्रित चेहरे...]

श्यामा : (फडक्यांकडे लक्ष जाताच) काका, तुम्हीही प्यायलात...? (चकित होते.)

फडके : नाही! (तोंडावर वास येऊ नये, म्हणून हात धरतात.) नाही! मी प्यायलेलो नाही.

शिरूभाऊ : ते प्यायलेले नाहीत, ग...माझी नक्कल करताहेत.

जिजी : काका नाही प्यायचे. ते नक्कल करताहेत त्यांची...

[ फडके स्वतःशीच हाट्, घोड्या, हाट् म्हणत दरवाज्यातून निघून जातात. श्यामा आणि यदुनाथ त्यांना पाठमोरे बघत असताना...]

जिजी : किती छान नकल करताहेत... पण ... ( सगळे हसतात...जिजीसुद्धा. )
शिरूभाऊ : ( अजून घोड्यासारखे ) यदू, श्यामा, म्हणा ना, रे...हाट्, घोड्या, हाट्...जिजी, पुढचं सांग ना...
जिजी : आता मला वेळ नाही...भूक आहे ना ?...मसाल्याचं वांगं करते... आणि बाजरीची भाकरी !

[ ती घाईघाईने स्वैपाकघराकडे जाते. जाता जाता डायनिंग टेबलाकडे थांबून वळून बघते...शिरूभाऊ तसेच गुडघ्यांवर घोडा घोडा करीत आहेत आणि श्यामा आणि यदू भान हरवून घोड्याचे गाणे म्हणत आहेत. ]

श्यामा व यदू : हाट्, घोड्या,हा ट्....हाट्, घोड्या, हाट्...बाजाराची वाट....बाजारात कोण गेलं...? जिजी आणि भाऊ...घरी कोण राहिलं...? श्यामा आणि यदू...

[ जिजी आत जाता जाता हसते. काळोख. ]

## दृश्य : तिसरे

[ स्थळ तेच. साधारणतः एक महिन्यानंतर. रात्रीची वेळ. रात्रीचे नऊ वाजत आले आहेत. विषण्ण सूर. डायनिंग टेबलापाशी जिजी खिन्न मनःस्थितीत बसली आहे. डोक्याला बाम चोळते आहे. तेवढ्यात बेल वाजते. जिजी दरवाजा उघडते. दारात शैला काळे उभी ! तिशीतली, जवान, नट्टापट्टा केलेली. ती आत येते. ]

जिजी : कोण पाहिजे ?
शैला : आपण जिजी ना ?
जिजी : हो ! आपण कोण ?
शैला : मी शैला काळे....म्हणजे....
जिजी : ( तुसडेपणाने ) आलं लक्षात !...इथं कशासाठी आला आहात ?
शैला : तुम्हांला भेटायला !
जिजी : ( फटकून ) मला ? कशासाठी ?

शैला : श्री म्हणाले...
जिजी : श्री ? श्री कोण ?
शैला : (अवखळ हसत) काय, जिजी, तुम्ही ? श्री म्हणजे तुमचे शिरूभाऊ–म्हणाले, एकदा जिजींना....श्यामाला भेटून घे !
जिजी : (चिडून) पण कशासाठी ?
शैला : (बसत) जिजी, मी थोडं बोलू का ? (जिजी उत्तर देत नाही. पण बघत राहते.) श्री....(हसते)...म्हणजे तुमचे शिरूभाऊ खूप दुःखी आहेत. ही इज व्हेरी अन्‌हॅपी !
जिजी : का ?
शैला : ते तुम्हांला ठाऊक आहे, जिजी ! एवढा मोठा कर्तबगार माणूस...सेल्फ-मेड एक्झिक्यूटिव्ह .... तो असा आतून दुःखी .... निग्लेक्टेड् असणं हे बरं नव्हे ! (जिजी रागारागाने बघत राहते.) तुमचं, जिजी, का नाही पटत घरात ?
जिजी : (चिडून) तो आमचा प्रश्न आहे ! आमचं आम्ही पाहून घेऊ ! दुसऱ्या कोणी नाक खुपसायची गरज नाही !
शैला : असं म्हणून, जिजी, प्रश्न सुटत नाही !...म्हणून त्यांना गरज वाटतेय्...माझ्या मैत्रीची !
जिजी : (चिडून) मग नाचा, गळ्यात गळा घालून !....पण बाहेर...
शैला : मी श्रींची मैत्रीण म्हटल्यावर तुमच्या सर्वांशी माझे मैत्रीचे संबंध राहू शकणार नाहीत का ?
जिजी : (चिडून) नाही....मुळीच नाही !
शैला : श्यामा तसं नाही म्हणाली...
जिजी : (चमकून) ती कुठं भेटली ?
शैला : आज दुपारी मी भेटले तिला...तिच्या ऑफिसात...
जिजी : कशासाठी ?
शैला : ओळख करून घेण्यासाठी !.... फार चांगली मुलगी वाटली ! श्रीसुद्धा सांगतात...ती फार चांगली मुलगी आहे, म्हणून !
जिजी : श्यामा काय म्हणाली ?
शैला : तिचा विरोध आहे, असं नाही मला वाटलं ...
जिजी : (गडबडून) कशाला ? कशाला विरोध नाही तिचा ?
शैला : जिजी, तुम्ही असे संशयानं...जेलसीनं प्रश्न विचारण्यापेक्षा थोडा अधिक समंजसपणा दाखवायला हवा ... माझी मैत्री ही श्रींची निकडीची गरज आहे...

जिजी : (चिडून) मैत्री ? म्हणजे काय ? क्षणिक धुंदी...मौज....मजा... एवढंच ना ?

शैला : का ? क्षणिक धुंदी ... मौज .... मजा यांना आपल्या आयुष्यात महत्त्व नसतं ?....मग तुम्ही लग्नाआधी श्रींशी शरीरसुख घेतलंत, ती धुंदी .... मौज नव्हती ?...दिवस गेले, म्हणूनच ना श्रींना जबरदस्तीनं तुमच्याशी लग्न करावं लागलं ?

जिजी : (एकदम भडकून) गेटाऊट....यू बिच् !

[ शैला रागाने जाते. जिजी धाडकन दरवाजा लावून घेते आणि बंद दरवाज्याला पाठ टेकून उभी राहते.
प्रकाश थोडा मंद होतो. जिजीच्या तोंडावर प्रकाशझोत. समोर शिरूभाऊ असल्याप्रमाणे ती त्यांच्याशी बोलू लागते. ]

जिजी : हे तुम्ही...तुम्ही या बदफैली बाईला सांगितलंत ? आमच्या जीवनातले खाजगी, नाजूक क्षण हिला.... या बाजारबसवीला उघडून दाखवलेत ? ....काहीच नाही वाटलं तुमच्या मनाला ? आपलं लग्न होण्याआधी मी तुमच्याशी शरीरसुख घेतलं... तुम्हीच मला मोहात पाडलंत... ते... ते तुम्ही हिला सांगितलंत ? आणि... आणि ... दिवस गेले, म्हणून तुम्ही माझ्याशी लग्न केलंत ? जबरदस्तीनं ? मला दिवस गेले नसते, तर तुम्ही लग्न केलं नसतं माझ्याशी ? लग्न होऊन आता तेवीस-चोवीस वर्षं झाली ! पहिली पंधरा-सोळा वर्षं तरी आपली सुखात गेली तेव्हा या जबरदस्तीचं कधी बोलला नाहीत ते ? (संतापाच्या भाराने थकते. उसासे टाकते. थकलेल्या चालीने डायनिंग टेबलाशी येऊन बसते. स्वतःशीच.. स्वतःलाच समजावण्यासाठी बोलू लागते. कपाळ चोळते...) तेव्हा माझं वय वाढलं होतं... लग्न होईल, की नाही, असं वाटत होतं... सगळ्याच गोष्टींची घाई झाली होती... म्हणून त्या वेळी चुकले असेन मी....ते आता श्यामाच्या नशिबी यायला नको, म्हणून जीव तडफडतोय माझा !

[ ती कपाळाला बाम चोळत बसून राहते. तेवढ्यात लॅच-कीनं दरवाजा उघडून श्यामा आत येते. ती थकली आहे. तिच्या हातात पिशवी आहे. ]

श्यामा : जिजी, तुझं झालं का पुन: बाम चोळणं सुरू ? ( जिजी नुसती बघत राहते.

ती थकलेली आहे.) ह्या वासानं डोकं नुसतं भणाणतं ... ( पिशवी टेबलावर ठेवते. )

जिजी : तुला आज उशीर का ?

श्यामा : सिनेमाला गेले होते...मेट्रोला !

जिजी : एकटीच ?

श्यामा : रंजना होती बरोबर...(थांबून) कुमार आला होता...

जिजी : कुमार कोण ?

श्यामा : कुमार साठे.... तो आणि त्याची बायको... !

जिजी : बोलला तुझ्याशी ?

श्यामा : मीच चुकवलं त्याला....

जिजी : त्याच्याशी तुझं लग्न झालं असतं, तर सुटली असतीस...तू आणि मी.... पण जिथं तिथं यांची जबरदस्ती !

श्यामा : तो माझ्यापेक्षा दोन वर्षांनी लहान, म्हणून भाऊ नको म्हणाले असतील.

जिजी : त्यांची बायको त्यांच्यापेक्षा तीन वर्षांनी मोठी आहे !

श्यामा : तेच तर, जिजी, तुमच्यांतल्या तेढीचं कारण नसेल ?

जिजी : ( संशयाने बघत ) हे तुला कोणी सांगितलं ?

श्यामा : कोण सांगणार ?

जिजी : शैलानं ?

श्यामा : कोण शैला ?

जिजी : ती बाजारबसवी...शैला काळे ! ( श्यामा काही बोलेल, म्हणून अपेक्षेने पाहते ) ती आली होती ना ?

श्यामा : हो ! ( जिजीकडे शोधक नजरेने बघत राहते. )

जिजी : काय म्हणत होती ?

श्यामा : ओळखीसाठी आले, म्हणाली. इथंही येणार म्हणत होती.

जिजी : आली होती...पण तुझ्याशी बोलली काय ?

श्यामा : काही नाही, ग ! उगाच इकडलं तिकडलं...

जिजी : तुझा विरोध नाही, असं म्हणाली...

श्यामा : विरोध कशाला ?

जिजी : तेच मला कळलं नाही. (श्यामा पिशवी उचलून आत जायला निघते.)

श्यामा : कोण जाणे !

जिजी : ( संशयाने वेध घेत ) ती...ती.... आमच्या लग्नाबद्दल काही म्हणाली ?

श्यामा : लग्नाबद्दल ? काय ? ( ती काही लपवते आहे का, या विचाराने जिजी तिला बघत राहते. ) मी भाजी करते.... भाऊंना आवडते, म्हणून

माठाची भाजी आणलीय्....( आत जाऊ लागते. )

जिजी : ( नापसंतीने श्यामाला बघत ) ते जेवायला येणारच नाहीत.

श्यामा : ( वळून ) त्यांनी सांगितलंय् ?

जिजी : सांगायला कशाला पाहिजे ? हल्ली वेळेवर येताहेत कुठं ते ?

श्यामा : कारखान्यात संपाचं वातावरण आहे, म्हणून...

जिजी : शैला काळेबरोबर फिरायचं असतं, म्हणून .

श्यामा : ( क्षणभराने ) जेवण गरम करू ?

जिजी : कर ! सगळं सकाळचंच आहे... मी जेवलेच नाही ... यदू सकाळीच कुठं गेलाय् , त्याचा पत्ता नाहीये....

श्यामा : भाऊंना तरी फोन करायचास....

जिजी : केला ! ( दोघी एकमेकींना बघतात. श्यामा आत जाते. ती आत जाता जाता ) शेगडीवरच्या डब्यात थालीपीठं आहेत... (श्यामा आत जाते. परत बाहेर येते. )

श्यामा : फडकेकाका आले होते ?

जिजी : ( संशयाने ) का ?

श्यामा : सहज ! ( ती काही बोलेल, म्हणून जिजी बघत राहते. )

जिजी : तरी पण...

श्यामा : एक विचारू, जिजी ? रागावणार नाहीस ?

जिजी : नाही रागावणार ! तू माझी मुलगी आहेस...तशी माझी मैत्रीणही आहेस ! श्यामा, तुला ठाऊक आहे...मला लाज वाटते, म्हणून मी कुठं मैत्रिणी-कडे सुद्धा जात नाही !...बोलायला...मन मोकळं करायला मला नवराही नाही ! येऊन जाऊन बोलायचं, ते तुझ्याशीच ! विचार... काकांचं काहीतरी विचारणार असशील ?

श्यामा : ते तुला आवडतात ?

जिजी : यांनाही तसंच वाटत असेल का ? वाटतंच. पण एक लक्षात ठेव, मी यांच्यासारखी नाही.

श्यामा : ते माहीत आहे, ग... पण तरीसुद्धा... ( किंचित हसते. )

जिजी : काही गोष्टी फडकेकाकांच्या कुणालाही आवडतील, मलाच नाही, कुठल्याही बाईला ! आपल्या बायकोवर निष्ठेनं प्रेम करणं .. तिला, घराला ॲटॅचड् राहणं...दुसऱ्या बाईची हाव न धरणं....

श्यामा : त्यांना तुझ्याबद्दल आकर्षण नसेल...काकांना ?

जिजी : तसं आकर्षण सुंदर असतं, श्यामा ! वखवखणं, हाव धरणं वाईट !

श्यामा : पण भाऊंना ते आवडत नसेल, तर ?

जिजी : त्यांनी तो हक्कच गमावलाय्... आपल्या वागणुकीनं....

[ तेवढ्यात दारावरची बेल दोनदा वाजते. ]

श्यामा : भाऊ आलेत...तू दार उघड...मी जेवण गरम करते...( आत जाते. )

[ जिजी दरवाजा उघडते, आणि बाजूला होते. शिरूभाऊ आत येतात. ते थोडेसे पिऊन आलेले आहेत. त्यांचा किंचित तोल जातो आहे. टाय्‌ची गाठ सैल केलेली आहे. ते हातातली बॅग पुढे करतात... पण जिजी बॅग घेत नाही. ते बॅग ठेवतात. बसण्यापूर्वी थोडे गोंधळतात. त्यांना उशीर झाला आहे. ते पिऊन आले आहेत. त्यामुळे त्यांना थोडे अपराधी वाटते आहे. ते एक-दोनदा न पाहिल्यासारखे करून जिजीकडे बघतात. पण ती परक्यासारखी दूर आहे. ते कोट काढून तिने घ्यावा, म्हणून क्षणभर धरून ठेवतात. पण ती घेत नाही. कोट कोचावर टाकून ते बसायला जातात. ]

शिरूभाऊ : ( जीभ थोडी जड ) जिजे....यदू आला ? ( घालून घेतल्यासारखे बसतात. )
जिजी : ( मान हलवीत ) नाही !
शिरूभाऊ : कुठं गेलाय् ?
जिजी ( वैतागून ) कोण जाणे ! कुठल्या कुठल्या जुगारी अड्ड्यावर जातो.
शिरूभाऊ : तो येईल ! ( थांबून ) तू काळजी करू नकोस.
जिजी : मी कुणाचीच काळजी करीत नाहीय्... संबंधच काय माझा ?
शिरूभाऊ : तू, जिजे, बारीकसारीक कारणावरून उगाच डोक्यात राख घालून घेऊ नकोस.

[ श्यामा तो आवाज ऐकून स्वयंपाकघराच्या दारात येऊन भिंतीला धरून बघत राहते. ]

जिजी : ( हतबल आवाजात ) मी कशाला राख घालू ! तुम्ही या...उशिरा या .. काय हवं ते करा....
शिरूभाऊ : आज अगदी थोडीच प्यालोय्....खांडकरांना कंपनी, म्हणून ! जयवंतराव खांडकर...आपले पर्सोनेल मॅनेजर... ( ती बघत राहते. ) रामनाथन्

संपासाठी मीटिंग घेतोय्. म्हणून खांडकरांबरोबर बसलो होतो, टु डिस्कस द स्ट्राईक सिच्युएशन...(जड जिभेमुळे बोलताना त्रास होतो).

जिजी : आणखी बरोबर कोण होती?

शिरूभाऊ : (तिला आवर घालीत) श्...! जिजे, तू पुन्हा जुन्या वाटेनं जाते आहेस! त्या दिवशी आपलं सगळं मिटलं आहे.

जिजी : काय मिटलं?

शिरूभाऊ : मी तुला सांगितलंय्...त्या दिवशी सांगितलं, की नाही? तुझी क्षमा-सुद्धा मागितली.

जिजी : ही शैला काळे कोण?

शिरूभाऊ : (जरा गडबडून) कोण?

जिजी : शैला काळे!

शिरूभाऊ : तिचं काय झालं?

जिजी : ती इथं आली होती.

शिरूभाऊ : मीच सांगितलं होतं तिला. तुला भेटायला.

जिजी : कशासाठी?

शिरूभाऊ : तुझी ओळख करून घेण्यासाठी!

जिजी : कशासाठी ओळख?

शिरूभाऊ : तिचं आणि तिच्या नवऱ्याचं पटत नाही! महामूर्ख आहे तो प्रोफेसर काळे...बायकोशी पटवून घेता येत नाही. (ती बघत राहते.) छळ करतो तिचा...(ती तशीच बघत राहते.) तिला मी स्वतःच्या पायांवर उभी करणार आहे.

जिजी : म्हणजे काय करणार?

शिरूभाऊ : तिला आमच्या साबणाची एजन्सी देणार!

जिजी : (चिडून) का? रोझी म्हातारी झाली? (ती आत जायला निघते.)

शिरूभाऊ : जिजे, तू उगाच अशी चिडू नकोस.

श्यामा : (मध्येच) भाऊ, तुम्ही जेवणार ना? लाल माटाची भाजी करतेय्...

शिरूभाऊ : (जिजी एकदम वळून श्यामाकडे बघते.) मी जेवून आलोय्, ग...पण थोडी पिणार आहे. (श्यामा आत जाते.)

[ जिजी तडक निघून जाते. शिरूभाऊही तोल सावरीत आत जातात आणि ग्लासातून व्हिस्की घेऊन येतात. ते बसतात, न बसतात, तोच जिजी उशी आणि चादर घेऊन आपल्या बेडरूममधून बाहेर येते. आणि श्यामाच्या बेडरूममध्ये जाऊ लागते. ते तिच्याकडे बघत राह-

तात. काय बोलावे, ते त्यांना कळत नाही....मग...]

शिरूभाऊ : (पश्चात्तापदग्ध आवाजात) जिजी... (जाता जाता ती थांबते.... त्यांच्याकडे पाहते.) आय् ॲम सॉरी! जिजे, मला क्षमा कर! माझ्या हातून चूक झाली! (ती काही न बोलता जाऊ लागते.) जिजे, जरा इथं येऊन बस. आपण थोडं बोलू...लेट्स् डिस्कस!

जिजी : (शांतपणे, पण निक्षून) आता बोलण्यासारखं काही राहिलेलं नाही. या क्षणापासून मी तुमची कोणीही नाही! हे घर सोडून जाऊ म्हटलं, तर माझ्यासारखीनं कुठं जायचं, हा प्रश्न आहे! श्यामाला, यदूला मानसिक त्रास होईल...यदू तर हाताबाहेर गेलाच आहे, म्हणून निलाजरेपणानं मला इथं राहावं लागणार आहे! पण एक ठाम...निक्षून सांगते ....त्या बेडरूममध्ये मी यापुढं पाऊलही ठेवणार नाही! मी श्यामाच्या बेडरूममध्ये झोपणार! तिथं तुम्ही पाऊल ठेवायचं नाही! (ती श्यामाच्या खोलीत जाते.)

[शिरूभाऊ अवाक् होऊन तिच्याकडे बघत राहतात. ती शांतपणं श्यामाच्या बेडरूममध्ये जाते. अस्वस्थ होऊन शिरूभाऊ पिऊ लागतात. श्यामाच्या खोलीतून जिजी परत येते. तेवढ्यात दरवाज्याची बेल वाजते. दारात फडके काका. ती काही न बोलता स्वयंपाकघरात जाऊ लागते.]

फडके : (आत येत) यदू आला का?

[जिजी काही न बोलता आत जाते. घरातला अवघडलेपणा फडक्यांच्या लक्षात येतो.]

फडके : (शिरूभाऊंना) यदू अजून आला नाही?
शिरूभाऊ : (पिता पिता) नाही अजून....! जेवण झालं?
फडके : जेवण कसलं? दोन थालीपीठं खाल्ली!

[बसतात. शिरूभाऊ त्यांच्याकडे संशयी नजरेनं पाहतात.]

डके : पुन्हा काही नवीन प्रकरण?

शिरूभाऊ : कुणाचं ?
फडके : तुमचं ?
शिरूभाऊ : कशावरून ?
फडके : घरात वातावरण तंग दिसतंय् !
शिरूभाऊ : ते नेहमीचंच. ( पितात. )
फडके : मध्यंतरी थोडं सुरळीत होतं...
शिरूभाऊ : चालायचंच ! पिणार ?
फडके : त्या दिवशी प्यालो, ते खूप झालं. त्या नशेत काय काय बोललो, परमेश्वर जाणे. काही बोललो ?
शिरूभाऊ : काही बोलण्यासारखं होतं ? किंवा न बोलण्यासारखं ?
फडके : ( किंचित हसून ) न बोलण्यासारखं खूप असतं, म्हणून म्हणतो.... ( थांबून ) जेवण झालं...?
शिरूभाऊ : हो ! मी खांडकरांच्या घरीच जेवून आलो. आज तिथं छोटीशी पार्टी होती.
फडके : का ? सहज ?

[ जिजी सरबत घेऊन स्वयंपाकघरातून येऊ लागते. ]

शिरूभाऊ : ( जिजीने ऐकावं, म्हणून ) खांडकरांची पहिली बायको माहेराहून आली....
फडके : ( आश्चर्याने हसत ) त्यासाठी पार्टी ?
शिरूभाऊ : खांडकरांनी दुसरं लग्न केलं, म्हणून ती चिडून माहेरी गेली होती. ती शांत होऊन परत आली.

[ चाल मंद करून जिजी ऐकते. सरबत ठेवते आणि श्यामाच्या खोलीत जाऊ लागते. तेवढ्यात...]

फडके : यदू बहुधा ट्रिपला गेला असावा.
जिजी : ( वळून ) जाणार होता ?
फडके : खंडाळ्याला जाईन, म्हणाला होता....

[ जिजी श्यामाच्या खोलीत जाते. ]

शिरूभाऊ : ( खालच्या आवाजात ) यदू खरंच म्हणाला होता !
फडके : काय ?
शिरूभाऊ : ट्रिपला जाणार, म्हणून ?
फडके : ( मानेने नाही म्हणत ) खोटं सांगितलं...तेवढीच जिजींची काळजी कमी. ( सरबत संपवतात आणि जायला उठतात. ) जातो....

[ ते जाऊ लागतात, तोच बेल वाजते. फडके दरवाजा उघडतात. दारात यदुनाथ उभा. तो इतका प्यायला आहे, की त्याचा तोल जातो आहे. फडके त्याला एकदम जवळ घेतात आणि आधार देतात. ]

फडके : ( आनंदाने ओरडतात ) जिजी...जिजी...शिरूभाऊ, यदू आला !

[ आतून जिजी–श्यामा धावत येतात. शिरूभाऊ उठून उभे राहतात. त्यांचा तोल जातो. सर्वांच्या तोंडावर हर्ष–चिंता संमिश्र. ]

यदुनाथ : ( तारेत ) अरे, मी इथं कसा ?
फडके : म्हणजे ?
यदुनाथ : मी फडकेकाकांच्या दारावरची बेल वाजवली होती.
जिजी : ( त्याला जवळ घेत ) यदू, काय ही तुझी दशा !
शिरूभाऊ : ( चिडून ) त्याच्या एक मुस्कटात मार ! इथं पिऊन आलाय्...( हातातली आपण पितात. ) दारू पिऊन...
यदुनाथ : मी दारू प्यालेलो नाही...
शिरूभाऊ : ( चिडून ) मग काय ताक प्यालास ?
यदुनाथ ( अडखळत ) ताडाच्या झाडाखाली ताक प्यालो...
शिरूभाऊ : ( चिडून ) चालायला लाग इथनं...!
फडके : तुम्ही थांबा, शिरूभाऊ...

[ खालून मित्रांच्या शिट्या ऐकू येतात. त्याला पोचवायला आलेले मित्र शिट्या मारतात. त्या ऐकताच तो गॅलरीत जातो आणि स्वतःही दोन शिट्या मारतो. आणि मित्रांना हात करीत...]

यदुनाथ : गडावर सुखरूप पोचलो. आता सुखानं डोळे मिटतो....( आत येतो ) चला, काका, आपल्या घरी जाऊ....

[ फडके, जिजी आणि श्यामा त्याला धरून बाहेर नेतात. जाता जाता शिरूभाऊंना...]

यदुनाथ : टा ऽऽ टा ! टा ऽऽ टा....!,

[ शिरूभाऊ तसेच दगडासारखे उभे राहतात. क्षण, दोन क्षण...तेवढ्यात जिजी आणि श्यामा परत येतात. श्यामा आपल्या खोलीत जाते. जिजी स्वयंपाकघरात जाते. ]

जिजी : (जाता जाता) आपलं पोर आणि त्याला परक्याचं घर...आपलं वाटतं.

[ हे ती स्वतःशीच बोलते. पण शिरूभाऊंसाठी. ते ती आत जाईपर्यंत मान हलवीत पाहत राहतात. ]

शिरूभाऊ : (ती आत जाताच) तो परका का ? इथं परका मी...मी...परका...

[ ते तसेच तोल जात असताना उभे आहेत. तेवढ्यात पाण्याचा तांब्या आणि फुलपात्र घेऊन जिजी येते आणि श्यामाच्या खोलीत जाऊ लागते. ]

शिरूभाऊ : (ती समोरून जात असताना) जिजे, जिजे...(ती न बघता पुढे जाते) जिजे, आपल्याही बेडरूममध्ये पाण्याचा तांब्या ठेव. (ती न ऐकता पुढे जाते.) जिजे, हे तुझं वागणं मला सहन होत नाहीये...त्रास होतोय्...आपण आपल्या बेडरूममध्ये झोपू. (तिच्या मागून श्यामाच्या बेडरूमच्या दाराशी जाऊन) एकदाचं मिटवून टाकू....वन्स फॉर ऑल...! (जिजी त्यांच्या तोंडावर धाडकन दरवाजा बंद करते.) जिजे, जिजे... दार उघड...!

[ ते क्षणभर गोंधळून तिथेच उभे राहतात. आत जाताना जिजीने दिवाणखान्यातले मोठे दिवे घालवलेले आहेत. एक मंद दिवा आहे. ते येऊन सोफ्यावर बसतात. पार्श्वभूमीवर विरहाचे सूर...ग्लासातला शेवटला घोट पितात आणि ग्लास खाली ठेवतात. उठतात. शर्ट काढीत

स्वयंपाक–खोलीत जातात. उघड्याने पाण्याची बादली घेऊन आपल्या बेडरूममध्ये ठेवतात. बाहेर येतात. दरवाजा उघडून बाहेर जातात. दरवाजा ओढून घेतात, आणि दरवाज्यावरची बेल वाजवतात... श्यामाच्या बेडरूमचा दरवाजा उघडून जिजी बाहेर येते. दरवाज्याकडे बघत...]

जिजी : कडी लावलीच नव्हती, वाटतं...

[ म्हणत दरवाजा उघडते...एकदम दचकते....शिरूभाऊ झटक्याने पुढं येतात. दरवाजा बंद करीत तिचा हात धरतात आणि तिला आपल्या वेडरूमकडे ओढू लागतात. ]

शिरूभाऊ : जिजे...जिजे...तू आपल्या बेडरूममध्ये...
जिजी : तुम्ही बऱ्या बोलानं माझा हात सोडा....

[ ते दोन्ही हात धरून तिला ओढू लागतात...]

शिरूभाऊ : जिजे....जिजे...मला क्षमा कर...आज तू आपल्या बेडरूममध्ये... आजची रात्र...फक्त एक रात्र...( ओढतात. )
जिजी : ( दबलेल्या आवाजात ओरडते ) माझे हात सोडा...हात सोडा माझे. नाहीतर मी ओरडेन...

[ सुटण्यासाठी धडपड करते. तरीही तिला ओढतात. ]

शिरूभाऊ : मला तुझ्याशी बोलायचंय्...खूप महत्त्वाचं बोलायचंय्....
जिजी : सोडा मला....मी हाताला चावीन...!
शिरूभाऊ : ( ओढत ) चाव चाव...मला रक्तबंबाळ कर....( तिला बेडरूमपर्यंत नेतात.)
जिजी : ( प्रतिकार करीत मोठ्याने ओरडते. ) श्यामा....श्यामा...यदू.... यदुनाथ....

[ श्यामा बाहेर येते. दचकते.. घाबरते. ]

श्यामा : (पटापट दिवे लावीत) भाऊ...भाऊ...जिजींना सोडा....सोडा आधी, भाऊ....हे काय चाललंय् तुमचं ?

[ती रडू लागते, तेवढ्यात बाहेरच्या दरवाज्यावर धैडाधड थापा पड-तात. श्यामा दरवाजा उघडायला धावते....]

शिरूभाऊ : (ओरडत) खबरदार, श्यामा, दरवाजा उघडशील, तर... !

[श्यामा रडता रडता दरवाजा उघडते. दारात यदुनाथ उभा. पाठी-मागे फडके उभे.]

यदुनाथ : (एकदम ओरडतो) भाऊ, हात सोडा !

[वेगाने तो गॅलरीच्या कोपऱ्यात धावतो आणि दांडका घेतो. एकदम फडके त्याला मिठी मारून आवरतात.]

फडके : काय हे, शिरूभाऊ...?

[श्यामा, यदुनाथ, फडके-शिरूभाऊंकडे बघत आहेत. त्यांची आणि जिजींची मान शरमेनं खाली जाते...आणि एकदम काळोख होतो....]

प ड दा

# अंक दुसरा

[ शिरूभाऊंचे घर. काही दिवसांनंतर. दिवेलागणीची वेळ. श्यामा एकटीच घरी आहे. फोन वाजतो आहे. ती फोन घेते. ]

श्यामा : ( फोनवर ) हॅलो.... ! ( काळजीच्या सुरात ) नाही, हो ! नाही अजून आलेली. भाऊंना मी ऑफिसमधे फोन केला. पण ते दुपारपासूनच ऑफिसमध्ये नाहीयेत. ( ऐकून ) हो, हो...ठेवते. (फोन ठेवते.)

[ दरवाज्याची वेल वाजते. श्यामा दरवाजा उघडते. यदुनाथ आत येतो. केस कसे तरी विस्कटलेले. सिगारेटचे झुरके घेतो आहे. ]

श्यामा : ( चिंताग्रस्त ) बाबा, आहेस कुठं तू ?

यदुनाथ : काय झालं ?

श्यामा : काय, झालं काय ? जिजीचा कुठं पत्ता नाहीये...

यदुनाथ : म्हणजे ?

श्यामा : सकाळपासून कुठं गेलीय् ती ....सगळी भांडी उपडी आहेत.

यदुनाथ : जेवण ?

श्यामा : जेवण केलं नव्हतं...माझा डबासुद्धा आला नव्हता.

यदुनाथ : फडकेकाकांना कळवलं ?

श्यामा : ते ऑफिस सुटल्यावर आले, तेव्हा मी सांगितलं त्यांना....

यदुनाथ : ते कुठं गेले ?

श्यामा : तीन पत्ते घेऊन गेले. ( यदुनाथ चिंताग्रस्त होऊन बसतो. ) तुला काय वाटतं ?

यदुनाथ : काय ? ( झुरके सोडतो. )

श्यामा : कुठं गेली असेल ?
यदुनाथ : आज ती बया इथं यायची होती !
श्यामा : कोण ?
यदुनाथ : तीच...शैला काळे.
श्यामा : कशाला ?
यदुनाथ : इथं राहणार आहे; म्हणे, ती कायमची....
श्यामा : तुला कोणी सांगितलं...?
यदुनाथ : जिजीनं...
श्यामा : जिजी मला कशी बोलली नाही ? (रडू लागते.)
यदुनाथ : तू अशी रडशील, म्हणून !
श्यामा : रडू नको, तर काय करू ? काय आहे आपल्या हातांत ?
यदुनाथ : (उठत) खरं आहे. आपला जन्म आपल्या हातांत नाही. आपलं आयुष्य आपल्या हातांत नाही. (बाहेर जाऊ लागतो.)
श्यामा : (त्याला धरून) तू आता कुठं चाललास ?
यदुनाथ : सिगारेटचं पाकीट घेऊन येतो.
श्यामा : (त्याला गच्च धरून ठेवते.) तू आता कुठं जाऊ नकोस ! (तो तिच्या डोळ्यांत बघतो. ती भेदरलेल्या नजरेने त्याला) माझे हातपाय थंड पडताहेत....कदाचित मला चक्कर येईल.
यदुनाथ : कॉफी करून देऊ ?
श्यामा : नको ! तू बोल...बोलत राहा काहीतरी...
यदुनाथ : (बसतो) काय बोलू ? तू विचार काहीतरी...
श्यामा : (कृत्रिमपणे) पूर्वीसारख्या तू कविता करीत नाहीस ?
यदुनाथ : (मानेने नाही म्हणत) अं हं...!
श्यामा : का ?
यदुनाथ : का करायच्या कविता ? कशासाठी ? कशात कसला परपजच वाटत नाही.
श्यामा : तू, यदू, पूर्वीसारखा अभ्यास केला असतास...तर आता कॉलेजात गेला असतास. कवी म्हणून तुझं नाव गाजलं असतं... ! याही परिस्थितीत तू शिकायला हवं होतंस !
यदुनाथ : तू शिकलीस....काय झालं ?
श्यामा : आमचं सोडा....आमचं शिक्षण डिग्रीसाठी. डिग्री नोकरीसाठी आणि नोकरी लग्नासाठी...
यदुनाथ : आणि लग्न ? लग्न कशासाठी ? ते तरी झालं का ? (दोनदा बेल वाजते.)

श्यामा : यदू, भाऊ आले...
यदुनाथ : ( धूर सोडीत ) उघड...
श्यामा : तू सिगारेट फेक...
यदुनाथ : का ?
श्यामा : बरं दिसत नाही !

[ तो सिगारेट फेकण्यासाठी गॅलरीत जातो. त्यासरशी खालून शिट्ट्या ऐकू येतात. तोही शिटी मारून हात हाल्वतो... तेवढ्यात श्यामा दरवाजा उघडते आणि त्यांच्या मागे शैला काळे आहे का, पाहते. शिरूभाऊ एकटेच आत येतात. त्यांनी कपड्यांच्या दोन बॅगा आणलेल्या आहेत. त्या ते बाजूला ठेवतात. श्यामा त्यांच्याकडे भीतीने, कुतूहलाने पाहते– नवख्या, अनोळखी माणसाकडे पाहावे, तसे. ]

शिरूभाऊ : जिजी कुठं गेली ?
श्यामा : (रडवेल्या आवाजात) भाऊ, जिजीचा कुठं पत्ताच नाही.
शिरूभाऊ : म्हणजे ?
श्यामा : सकाळपासून कुठं गेलीय् ती.... जेवण केलेलं नाही ! सगळी भांडी स्वयंपाकघरात उपडी आहेत.
शिरूभाऊ : (संशयाने) फडके कुठं गेलेत !
श्यामा : जिजीला शोधायला गेलेत.
शिरूभाऊ : कुठं ?
श्यामा : त्यांनी तीन–चार पत्ते घेतलेत...
शिरूभाऊ : कुणाचे ?
श्यामा : मालूताई चौबळ....कुसुमताई...नीराताई...
शिरूभाऊ : नीराताई कोण ?
श्यामा : चिटणीस...

[ शिरूभाऊ काही क्षण अस्वस्थपणे बसतात...हातांची बोटे एकमेकांवर आपटत राहतात. ]

श्यामा : बॅगा कुणाच्या ?
शिरूभाऊ : शैलाच्या. ती इथं राहायला येणार आहे...(मनगटावरचे घड्याळ बघत) एवढ्यात यायला हवी... ( किंचित रागाने ) म्हणूनच जिजी अपशकुन

करतेय्...आपलं नाक कापून. . (श्यामा एकदम हुंदका देऊन रडू लागते. पलिकडून यदुनाथ बघत राहतो) तुला रडायला काय झालं? तुम्हां कुणाला काही कमी होणार नाही.

श्यामा : (धीर करून, रडवेल्या आवाज) भाऊ, मी कधी तुम्हाला तोंड उघडून बोलले नाही. पण तुम्ही आमचा सगळ्यांचा बळी घेताय्....जिजीला सुख नाही. आज ती कुठं गेलीय्, कोण जाणे. माझं आणि यदूचं तर सगळं आयुष्यच विस्कटून गेलंय्... तो आज कॉलेजात शिकला असता, कवी म्हणून नावारूपाला आला असता... आपल्या आयुष्याला त्यानं उमेदीनं आकार दिला असता...

शिरूभाऊ : हे त्यानं करावं...सगळं करावं...मी काही कमी पडू देणार नाही.

श्यामा : या गोष्टी नुसत्या पैशानं होत नाहीत, भाऊ! घरात मन आनंदी राहील, असं वातावरण हवं.... माझं काय झालं? मी ऑफिसात असते, तेव्हा चार घटका माझं मन रमलेलं असतं... पण संध्याकाळी घरी येऊच नये, असं वाटतं. (यदुनाथ डोळ्यांवर हाताची मूठ ओढत दरवाजा उघडून बाहेर जातो. श्यामा आणि शिरूभाऊ त्याला वळून बघतात.) स्वप्नं बघण्याचं वय आमचं... पण आमची स्वप्नं तुम्ही चिरडून टाकलीत! (एकदम थोडा आवाज चढवून) कुमारला मोठा पगार नव्हता. पण त्याच्या आणि माझ्या पगारात आम्ही भागवलं असतं. पैशानं सुख मिळत नाही, हे तुम्हांला तरी कळायला हवं होतं. (स्वप्नात जात) तुम्ही दिलेल्या माझ्या लहानपणीच्या बाहुल्या... खेळणी...सगळं मी माळ्यावर जपून ठेवलं होतं. माझ्या पहिल्या मुलाला देण्यासाठी...

शिरूभाऊ : मी तुझं लग्न करून देईन...

श्यामा : सगळीकडे पत्रिकेचं निमित्त होणार आहे. असल्या बापाची मुलगी कुणीही आपल्या घरात घेणार नाही.

शिरूभाऊ : (एकदम भडकून) श्यामा, थोबाड फोडीन.... !

श्यामा : फोडा...ठार मारा मला...आज मी उभ्या आयुष्याचं बोलून घेतलंय्!

[एकदम रडता रडता ती धावत आपल्या खोलीत जाते. शिरूभाऊ तिला पाठमोरी बघत राहतात. ते व्हिस्की आणायला आत जाणार, तोच दरवाज्यावरची बेल वाजते. ते दरवाजा उघडतात... फडके येतात.]

फडके : आल्या का जिजी...?
शिरूभाऊ : नाही अजून!
फडके : तुम्हांला कधी कळलं?
शिरूभाऊ : आत्ताच....इथं आल्यावर.
फडके : मी तिन्ही ठिकाणी जाऊन आलो. चिटणीस...चौबळ, कुलकर्णी...त्या म्हणाल्या, कित्येक दिवसांत जिजी त्यांना भेटल्याच नाहीत.
शिरूभाऊ : बसा! मी व्हिस्की घेऊन येतो. तुम्ही घेणार?
फडके : नाही!
शिरूभाऊ : सरबत...?
फडके : काऽऽही नको! ( ते आत जाताना ) आता यांना शोधायचं कुठं?
शिरूभाऊ : येईल! बसा तुम्ही!

[ फडके अस्वस्थ होऊन बसतात...पुन्हा उठतात. ]

फडके : ( मोठ्याने ) शिरूभाऊ, आपण पोलीस स्टेशनवर जाऊ या का?
शिरूभाऊ : ( बाटली, ग्लास, पाणी घेऊन बाहेर येतात ) कशाला?
फडके : रिपोर्ट करायला....
शिरूभाऊ : रिपोर्ट काय करायचं?
फडके : कुठं ॲक्सिडंट झाला असला, तर... मघाशी श्यामा म्हणाली....श्यामा कुठं गेली...?

[ शिरूभाऊ ग्लास भरतात. ]

शिरूभाऊ : आत झोपली आहे...भ्यालीय् ती....
फडके : मघाशी मी आलो, तर रडायला लागली...
शिरूभाऊ : ( थंडपणे ) ती म्हणाली काय?
फडके : कोण?
शिरूभाऊ : ( पिता पिता ) श्यामा....
फडके : म्हणाली....जिजीनं जीवबीव तर....गाडीखाली...
शिरूभाऊ : छे!

[ ग्लास खाली ठेवून उठतात.. टेबलावर हळूच शोधाशोध करतात. ]

22369 नाटक


फडके : काय शोधताय् ?
शिरूभाऊ : काही चिठ्ठीबिठ्ठी ठेवलीय् का, पाहत होतो...
फडके : ( दचकून ) आहे...?
शिरूभाऊ : नाही ! ( येऊन बसतात. )
फडके : काल काही विशेष घडलं नव्हतं ना ?
शिरूभाऊ : काय घडणार ? रोजचंच !

[ एकदम फडक्यांचे बॅगांकडे लक्ष जाते. ]

फडके : या बॅगा कुणाच्या ? तुम्ही कुठं जाताय् ?
शिरूभाऊ : छे ! शैलाच्या त्या.
फडके : शैला कोण ?
शिरूभाऊ : शैला काळे....
फडके : ( एकम मोठ्याने हसत ) ओ...हो ! ती परांजप्यांची भावजय.... ( एकदम लक्षात येऊन ) तिच्या बॅगा इथं का ?
शिरूभाऊ : ती इथं यायची आहे !
फडके : कशासाठी ?
शिरूभाऊ : इथं राहायला....कायमची !
फडके : ( एकदम धक्का...उठून उभे राहतात. ) हे तुम्ही जिजींना सांगितलंय् ?
शिरूभाऊ : हो ! कालच.
फडके : मग बरोबर ! त्या घर सोडून गेल्यात.
शिरूभाऊ : जाऊ दे ! येईल परत...खांडकरांची बायको सहा महिन्यांनी परत आली. तिला राहायला माहेर तरी होतं...हिला तेही नाही !
फडके : अहो, पण जिजींनी आत्महत्या केली, तर...?
शिरूभाऊ : काही करीत नाही !
फडके : ( वैतागून ) छे छे ! हे सगळं भयानक आहे ! अहो, काय करायचं, ते बाहेर...फार तर चोरून करा. पण घरात....
शिरूभाऊ : हे बाहेर चोरून केलं, तरी लपून राहत नाही, फडके...
फडके : कसं कळणार ?
शिरूभाऊ : बरोबर कळतं ! मला वाटतं, बायकांना ते एक ॲडिशनल इंद्रियच असतं. त्या बरोबर ओळखतात.....रोझीसुद्धा मी दुसरीकडे गेलो, तर बरोबर ओळखते.. ( पितात ) नवऱ्याला सुख कसं द्यावं, हे अनेकदा बायकांना कळत नाही ! पण तो बाहेर सुख कुठं घेतो, हे त्यांना बरोबर

कळतं.

फडके : ( अस्वस्थपणे ) अहो, ही बाहेरची बाई घरात आली, की जिजीचं काय ? मुलांचं काय ?

शिरूभाऊ : काही बिघडत नाही. गरज आणि सवय या दोन गोष्टींमुळं सगळं काही जमून जातं...( शांतपणे पितात ).

फडके : ( हतबल होत ) अहो, पण, शिरूभाऊ, त्या बाहेरच्या बाईला...

शिरूभाऊ : ( चिडून ) तिला बाहेरची बाई...बाहेरची बाई म्हणू नका....

फडके : बरं ती कोण....अदर वुमन...ती शैला काळे...तिला घरात आणण्याचं कारण काय ? तिला तिच्या घरी राहू दे....

शिरूभाऊ : ( एकदम भडकतात ) होय...पण तो गाढव...

फडके : कोण ?

शिरूभाऊ : तिचा नवरा . प्रोफेसर काळे...मराठीचा प्रोफेसर...पण मिजास काय ? महामूर्ख.. !

फडके : त्यानं काय केलं ?

शिरूभाऊ : त्यानं चक्क तिला घराबाहेर काढली. माझ्या बरोबर फिरते, म्हणून.

फडके : मग तो महामूर्ख कसा ? ( हसतात ) काय, शिरूभाऊ, तुम्हीसुद्धा !

शिरूभाऊ : आता तावडतोब तिची सोय करणं....

फडके : हॉटेलात ठेवा. ते तुमचं शालिमार...थ्री झीरो थ्री...

शिरूभाऊ : आत्ता ती तिथंच आहे. पण, फडके.. फार खर्चाचं आहे ! शिवाय धोक्याचंसुद्धा... साले कुठकुठले भुकेलेले पुरुष येत असतात. या पुरुषांचा नेम नाही. म्हणून हॉटेलात जमणार नाही...कुठं छोटा ब्लॉक घ्यायचा, तर तीन, साडेतीन लाख रुपये काढायला हवेत...पण बघू... दुसरी काही व्यवस्था होईपर्यंत तरी ती इथं राहील. माझ्यावर मॉरल रिस्पॉन्सिबिलिटी आहे तिची. माझ्यासाठी तिला घर सोडावं लागलं. तिची नैतिक जबाबदारी माझ्यावर नाही ?

फडके : तिची नैतिक जबाबदारी...मॉरल रिस्पॉन्सिबिलिटी तुमच्यावर आणि जिच्याशी वीस—बावीस वर्षं संसार केलात, त्या बायकोबद्दल तुमची नैतिक जबाबदारी काहीच नाही ?

शिरूभाऊ : नाही कशी ? जिजीचं...मुलांचं सर्व काही पूर्वीसारखं होणार आहे.

फडके : ती घरात आल्यावर सगळं काही पूर्वीसारखं होईलच कसं ?

शिरूभाऊ : त्याला इलाज नाही. बायको म्हणून जिजी आता मला सुख देऊ शकत नाही. मला माझ्या आयुष्यात सुखाची गरज आहे...ती गरज घरच्यांनी ओळखायला हवी. ही त्यांची जबाबदारी नाही ? डोण्ट वरी .... आय्

विल मॅनेज...!

[पितात. क्षणभर दोघेही एकमेकांकडे बघतात. मग फडके फोन घेतात.]

फडके : हॅलो...हो ! मी फडके. हो हो ! नाही आलेली ! (ऐकून) काही कल्पना नाही....बरं.... (फोन ठेवतात.)

शिरूभाऊ : कोण ?

फडके : जिजींची मैत्रीण... नीराताई...चिटणीस...

शिरूभाऊ : काय म्हणत होती ?

फडके : काही नवीन भांडण झालं का, विचारत होत्या ... (शिरूभाऊ गप्प. फडके विचार करत) शिरूभाऊ, जिजींनी आत्महत्या केली, असं तुम्हांला कळलं या क्षणी, तर.. तर तुम्हांला काय वाटेल ?

शिरूभाऊ : तुम्हांला आठवतं, फडके...? तुमच्या कमलाबाईंची किडनी फेल होत होती, ते सांगताना तुम्ही माझ्या खांद्यावर मान टाकलीत .... आणि ढसाढसा रडलात...

फडके : रडलो, म्हणजे काय... ? (आवाज गदगदतो) मी दुभंगून, उन्मळून पडतोय्, असं मला वाटलं.

शिरूभाऊ : (थडपणे) मला तसं काहीही वाटणार नाही

फडके : तुम्ही कधीही सुखी होणार नाही, शिरूभाऊ ! ज्याला प्रेम कळलं नाही...

शिरूभाऊ : मला प्रेम आणि शरीरसुख यांत कधीच फरक करता आला नाही....

फडके : तुम्हांला एक खाजगीतलं सांगू का, शिरूभाऊ...?

शिरूभाऊ : काय ? (बाटली उचलून) थोडी पिणार का ? (हसतात.)

फडके : नको....नको.. ! (हसतात)

शिरूभाऊ : सांगा....

फडके : आमची कमल... तुम्हांला माहीत आहे. दिसायला बरी नव्हती. (किंचित कडवट हसत) आमचं दुर्दैव म्हणजे चांगली दिसणारी मुलगी आम्हांला सांगून कधी आलीच नाही. ज्या आल्या, त्यात कमल उजवी, म्हणून केली...पण मला ती मनापासून आवडत नव्हती.

शिरूभाऊ : म्हणता काय? तुमचं केवढं प्रेम तिच्यावर ?

फडके : हे मी सांगतोय्, ते लग्न झाल्यानंतरचं...पण मी नंतर एकदा विचार केला...आवडत नाही, आवडत नाही, म्हटलं, तर आम्ही दोघंही जन्मभर दुःखी होऊ...म्हणून मग आम्ही एकत्र फिरायला लागलो. बोलायला लागलो. एकमेकांची मनं उघडून दाखवायला लागलो. एकमेकांच्या

आवडीनिवडींत लक्ष घातलं...आणि एकदम चमत्कार झाला.... शिरूभाऊ, मग तिच्या रूपाचा, शरीरसुखाचा विचार गळूनच पडला. ती मग... मग गोडच दिसायची...तीच आपल्या अस्तित्वाचा आधार आहे, असं वाटू लागलं.

शिरूभाऊ : स्ट्रेंज! बाय् द वे ... कमलावहिनी जाऊन आता दोन वर्षं झाली. (खालच्या आवाजात) मला सांगा....तुम्हांला दुसऱ्या कुणा बाईबद्दल कधी...? (कानोसा घेतल्यासारखे बघतात.)

फडके : काही मनातून वाटणं...आणि तसं वागणं यांत फरक आहे, शिरूभाऊ! आपण माणसं आहोत....आपण विचार करून लक्ष्मणरेषा आखू शकतो.

शिरूभाऊ : (उडवून लावीत) ओ...लक्ष्मणरेषा! डॅम इट् ....! लक्ष्मणानं आखायची आणि सीतेनं ओलांडायची .... रावणासाठी ... (हसतात) हल्ली तर काही जण सीतेचंच रावणावर प्रेम होतं, म्हणतात...खरं?

फडके : (गंभीरपणे) मी कधी रावणाला भेटलेलो नाही!

[शिरूभाऊ दोन क्षण विचार करीत पितात.. मग फडक्यांकडे बघतात.]

शिरूभाऊ : तुम्हांला एक मोकळेपणानं विचारू का?

फडके : (अस्वस्थ होत) आपण इथं बडबडत बसलोय् आणि अजून जिजींचा पत्ता नाही... (उठायचा प्रयत्न करतात.)

शिरूभाऊ : (त्यांना दाबून बसवीत) बसा, बसा...येईल ती....जाते कुठं?

फडके : काय विचारणार?

शिरूभाऊ : (बारकाईने) तुम्हांला जिजीमध्ये काही इंटरेस्ट?

फडके : (कपाळाला हात लावीत) कर्म माझं! विचारून विचारून काय विचारलंत! (उठून खिन्न होत) जातो मी, शिरूभाऊ .... मला आज झोप यायची नाही.

शिरूभाऊ : (उठून त्यांना खाली बसवत) एवढं काही चिडायला नको, फडके...

फडके : पण तुम्हांला संशय का आला? शिरूभाऊ....मी इथं येतो, आपलेपणानं म्हणजे काय? (जुन्या जमान्यात जात) ही मुलं ... श्यामा.... यदू ... दोन–तीन वर्षांची होती ... नीता श्यामाबरोबरची . सगळी जिजीकडे वाढली. तुमचं त्या वेळचं सुखी कुटुंब....जिजींची संसार सुखी करण्याची, परिपूर्ण करण्याची धडपड... हे सगळं बघून बरं वाटायचं... मन रिझवण्यासाठी कोणी टेकडीवर जातो....कोणी समुद्र–किनाऱ्यावर जातो... मी तुमच्या सुखी कुटुंबात येत होतो...

शिरूभाऊ : तिला तुमच्याबद्दल... ?

फडके : ( मान हलवीत ) छे छे ! असं बोलून तुम्ही तुमची जीभ विटाळू नका आणि त्यांचाही अपमान करू नका .... ( थांबून ... अस्वस्थ होत .... सोफ्याचा कोपरा बोटाने चाचपू लागतात ) मला वाटतं ... यापुढं मी इथं येणं .... नाहीतरी रिटायरमेंट जवळ आलीच आहे... भिवंडीलाच राहावं, असा विचार आहे. ते उद्यापासनं करावं...

शिरूभाऊ : ( हसत ) ओ कमॉन, फडके...एवढं चिडायला नको. वी आर् फ्रेण्ड्स आफ्टर ऑल... ( ते कोपरा चाचपताहेत. हे लक्षात येताच ) तो शिवलेला आहे...फाडा...फाडा ! फाडा तो कोपरा... ! (हसतात. )

फडके : ( तरीही गंभीरच ) पण तुम्हांला संशय कधी आला ?

शिरूभाऊ : ( उडवून लावीत ) कुठला संशय ?

फडके : नाही ! शिरूभाऊ, तुमच्या मनात काही तरी आहे...सांगून टाका...

शिरूभाऊ : दोन वर्षांपूर्वी माझ्या वाढदिवसाची इथं पार्टी झाली.

फडके : ( आठवत ) हो...! तेव्हा मी प्रथम प्यालो....गाढवासारखा ! तेव्हा मी काही बोलल्रो का ?

शिरूभाऊ : नाही ! सांगू ?

फडके : खरंच सांगा...

शिरूभाऊ : त्या पार्टीत तुमचा व्हिस्कीचा अर्धा ग्लास जिजींनं तोंडाला लावला...

फडके : छे....छे ! अगदी खोटं ! भलतं सलतं मनात ठेवून तुम्ही, शिरूभाऊ, उगाच अन्याय करताय् ...

[ तेवढ्यात दारावरची बेल वाजते. ]

शिरूभाऊ : ( फडक्यांना ) उघडा दरवाजा...

फडके : जिजी असतील कदाचित...

शिरूभाऊ : शैलासुद्धा असेल...

फडके : शिरूभाऊ, तुम्ही हे शैलाचं प्रकरण...

शिरूभाऊ : सगळं जमून जाईल...डोंट वरी ! आय् कॅन व्हेरी वेल मॅनेज....

[फडके दार उघडतात...श्यामा आतून येते...पण दबकत, घाबरत येते ... कदाचित शैला आली असेल, म्हणून....पण बाहेरून जिजी येते. या क्षणी ती वेगळीच दिसते आहे. उमेदीत आणि आत्मविश्वासपूर्ण...धावत

जाऊन श्यामा तिला कडकडून मिठी मारते. आणि रडू लागते. ]

जिजी : ( ती अतिशय खुशीत आहे ) काऽही रडायला नको...मला काऽही झालेलं नाही.

[ श्यामाचे डोळे पुसते. तिच्या कपाळाचा मुका घेते. ]

श्यामा : ( डोळे पुसत ) सकाळी नवाला तू गेलीस... आता वाजले किती?
फडके : कुठनं तरी फोन करायचा, जिजी....!
जिजी : नाही केला! आज वेगळं स्वातंत्र्य घेतलं...आजपर्यन्त स्वातंत्र्य, की सुरक्षितता म्हटली, की सुरक्षितता बरी वाटायची...( निक्षून ) आता ती सुरक्षितता झिडकारायचं ठरवलंय् मी!

[ शिरूभाऊ बघत राहतात. ]

शिरूभाऊ : ( नवरेपणाने ) कुठं गेली होतीस?
जिजी : ( बेफिकिरीने ) का?
शिरूभाऊ : ( चिडून ) मला प्रश्न नको आहे. आय् मस्ट नो व्हेअर हॅड यू बीन....
जिजी : आय् ॲम नॉट बाऊंड टु गिव्ह यू एनी आन्सर! तुम्हांला उत्तर द्यायला मी बांधलेली नाही...
शिरूभाऊ : ( चिडून ) जिजी, तू मर्यादा ओलांडते आहेस!
जिजी : ( होकारी मान हलवीत ) आज प्रथमच!
फडके : ( दुःखाने ) आता मी गेलेलं बरं...निघतो मी...
जिजी : थांबा, फडकेकाका! प्रथमपासून तुम्ही या घराच्या दुर्दशेचे साक्षीदार आहात, म्हणून! ( थांबून ) आज मी ॲडव्होकेट मीना बर्वेना भेटून आलेय्.
शिरूभाऊ : हे बघ, नवऱ्याच्या मोटारीनं फिरून स्त्रीमुक्तीची चळवळ करणाऱ्या या बायका तुला खड्ड्यात घालणार...!
फडके : जिजी, आपल्यासाठी नसलं, तरी या मुलांसाठी...
जिजी : ( वैतागून! रडवेल्या आवाजात ) आजवर मुलांसाठीच थांबले....तीही उद्ध्वस्त झाली आणि मीही! ( तिचा गळा दाटून येतो ) त्यांना बायको म्हणजे प्रत्येक क्षणाला सेक्सी दिसायली हवी.
शिरूभाऊ : हो हो! बायको म्हणजे बायको...फूटपट्टी अकरा इंचांची चालत नाही.

हिला आपल्या नवऱ्याबद्दल...कधी....

जिजी : (तुच्छतेने) नवरा! रात्री शेजारी झोपले, तरी वाटत राहतं... ह्यांचा कार्यभाग उरकला, की हे बिछान्यावर पैसे फेकून निघून जातील.

शिरूभाऊ : (भडकून) ठीक आहे! शैला येऊ दे! दुसरं लग्न केलं, म्हणजे...

फडके : कसं कराल? हिंदू तुम्ही ..

शिरूभाऊ : (चिडून) मुसलमान होईन....

फडके : व्हा! दंगा झाला, तर दोनदा मराल! एकदा हिंदू तुम्हांला मुसलमान म्हणून मारतील आणि दुसऱ्यांदा मुसलमान तुम्हांला हिंदू म्हणून मारतील. मरा....!

[ जायला वळतात.... तोच उघड्या दरवाज्यात शैला काळे. गमतीने बेल वाजवीत राहते. सर्वजण तिला वळून बघता बघता पुतळ्यासारखी एकदम स्थिर होतात. फक्त शिरूभाऊ एकदम पंधरा-वीस वर्षांनी तरुण झाल्यासारखे स्वागताला पुढे जातात. ]

शिरूभाऊ : वेलकम्...वेलकम्...शैला...कम इन्! (तिला घेऊन येतात.) हिची (जिजीची) ओळख आहेच.

शैला : हो....! आपण बोललोही त्यांच्याबद्दल...

शिरूभाऊ : ही श्यामा, तू भेटलीच आहेस तिला...(ती नमस्कार करते...पण श्यामा फुरंगटून बघत राहते.) हे फडके....आमचे शेजारी...फ्रेंड... फिलॉसॉफर... अँण्ड गाईड....बैस ना.

शैला : (बसत) काय चाललंय्? एनिथिंग सीरियस....?

शिरूभाऊ : (तिच्या शेजारी बसत) नेहमीचंच... थोडी वादळी हवा...

फडके : मी निघतो...

जिजी : थांबा! शेवटचं ऐकून जा....

शिरूभाऊ : इनफ् ऑफ इट, जिजी! सगळं शैलाच्या पुढ्यात नको...

शैला : (हसत) निदान पहिल्याच दिवशी तरी नको...

जिजी : (चिडून) हा पहिला दिवस नाही....शेवटचा दिवस आहे...कान देऊन ऐका....तुम्हांला मी सोडणार आहे....

[ यदुनाथ दाराची चौकट धरून ऐकत उभा राहतो...]

शिरूभाऊ : मी तुला घटस्फोट देणार नाही. पोटगी मिळणार नाही!

जिजी : मला यांपैकी काहीच नको !
शिरूभाऊ : मग जाशील कुठं ?
जिजी : मी कुठंच जाणार नाही. ही जागा माझी आहे....माझ्या नावावर आहे. मी, श्यामा आणि यदू इथं राहणार...तुम्हांला इथनं जावं लागणार.... लक्षात ठेवा....या घटकेला मी तुम्हांला टाकलेलं आहे ...

[ ती श्यामाबरोबर शामाच्या बेडरूममध्ये जाऊ लागते. श्यामा रडते आहे. ]

शैला : जिजी, मी जरा बोलू का ?

[ फडके जाता जाता वळून बघतात. ]

जिजी : ( एकदम वळून फणकाऱ्याने ) काही नको ! एक लक्षात ठेव...घरघुशी, ती शेवटी घरघुशी...अशा बायकांना शेवटी कुठंच स्थान नसतं. ( निघून जाते. फडके जातात. )

शिरूभाऊ : तिनं अजून आपल्या नवऱ्याला ओळखलेलं नाही. ( आपल्या बेडरूम-मध्ये जाता जाता )... मी मनात आणलं, तर काय दुर्दशा होईल, ते ठाऊक नाहीय्.... ( जातात. )

[ एवढा वेळ दारात उभा असलेला यदुनाथ शीळ घालत आत येतो. आणि शैलाच्या पुढ्यात उभा राहतो. तिच्याशी हस्तांदोलन करतो. हात हलवीत... ]

यदुनाथ : शैला, मी यदुनाथ. ( हात सोडत नाही )
शैला : आय् नो...( हसते ) हात सोड ना...
यदुनाथ : ( मानेने नाही म्हणतो...हसतो. ) मला तू खूप आवडली आहेस. शैला...हा हात मी जन्मभर असाच हातात ठेवीन...चालेल ?
शैला : ( हसत ) अरे, माझं वय काय ?
यदुनाथ : काय ?
शैला : ( अवखळ हसत ) मी सांगणार नाही.
यदुनाथ नकोच सांगूस ! ते ओळखण्यात गंमत आहे.

शैला : ओळख, बघू...
यदुनाथ : ओळखलं....( तिच्या हातावर टाळी देत ) माझ्यापेक्षा चार वर्षांनी मोठी...
शैला : तुझं वय काय ?
यदुनाथ : ओळख, बघू...
शैला : माझ्यापेक्षा चार वर्षांनी लहान. ( हसते. )
यदुनाथ : ( आनंदाने तिच्या पाठीवर थाप मारीत ) बरोब्बर....! ( हसतो ... तीही हसते...दचकते. )
शैला : कसं ओळखलं ?
यदुनाथ : ( तिचा हात हातात घेत ) शैला, आयॅम सीरियस... आपण लग्न करू. मला तू इतकी आवडली आहेस !
शैला : ( त्याच्याकडे कौतुकाने बघत ) चार वर्षांनी लहान...?
यदुनाथ : पंचवीस वर्षांनी मोठा चालतो ?
शैला : त्यांचं प्रेम आहे माझ्यावर...
यदुनाथ : प्रेम ? ( कपाळाला हात लावतो. )
शैला : का ?
यदुनाथ : तुझ्याच हिताचं सांगतोय् मी, शैला, लक्षात घे.
शैला : ( हाक मारते ) श्री...
यदुनाथ : ( गडबडून ) हा श्री कोण ?
शैला : ( पुन्हा हाक ) श्री...
शिरूभाऊ : ( आतून ) आलो...आलो ...
यदुनाथ : हा श्री ? श्रीराम...( एकदम हसतो. )
शैला : काय झालं ?
यदुनाथ : काय गंमत आहे, पाहा...तो श्रीराम एकपत्नीवाला...तो आता रामभाऊ झालाय् , आणि हे श्रीराम....राम राम ! ( ती हसते ) तुझ्या हिताचं सांगतो...शैला, आपण लग्न करू...
शैला : अरे, पण मी श्रीला वचन दिलंय्...
यदुनाथ : शैला, मला ठाऊक आहे...यांच्या पैशासाठी....ऐशआरामासाठी...तू स्वतःच्या नवऱ्याला सोडून आली आहेस. आज तुला चार सुखं मिळतील...जिजीला दुःखी करून.... उद्या तुला जावं लागेल...
शैला : का ? ते माझ्याशी लग्न करणार आहेत....
यदुनाथ : जिजीशीही त्यांनी लग्नच केलं आहे...मघाशी जिजी काय म्हणाली, ते ऐकलंस ना तू ? घरखुशी, ती घरखुशी ! तुमचं घर म्हणजे रेल्वेची

वेटिंगरूम ! कनेक्टिंग ट्रेन येईपर्यन्त वाट बघायची... उद्या थकशील, तेव्हा कुणी तुला आधार देणार नाही. (ती विचार करीत बघत राहते.) अग, आणखी दोन–चार वर्षांनी तू सुखासाठी रात्रभर जागून तळमळशील, तेव्हा रामभाऊ कुशीवर वळून घोरत असतील...

शैला : शेजारी जिजी असल्या, म्हणजे ते घोरत पडतात...

यदुनाथ : (चिडून) खबरदार जिजीबद्दल काही बोललीस, तर...!

जिजी : (ते ऐकून बाहेर येत रागाने) काय म्हणालीस ? (पुढे येत) काय म्हणालीस तू ? (पाठीमागून श्यामा येते.)

शैला : तुझ्या नवऱ्याला विचार...फ्रिजिड बाईकडे...(जिजी फाडकन् तिच्या थोबाडीत देते.) खबरदार माझ्या अंगाला हात लावाल, तर... !

[तेवढ्यात यदू कोपऱ्यातली छडी तिला देतो...]

जिजी : (छडीने मारत) काय म्हणालीस ? पुन्हा तो शब्द तोंडातनं तरी काढ...

[आणखी दोन छड्या मारते...ती ओरडू लागते.... 'श्री...श्री...!!' शिरूभाऊ धावत येतात आणि मध्ये पडतात. एखादी छडी त्यांच्या अंगावर बसते. ते छडी खेचून घेतात. श्यामा जिजीला मागे ओढू लागते.]

जिजी : (रागारागाने) खरं म्हणजे मारायला हवं मी तुम्हांला...पण कधीतरी आपलं लग्न झालं होतं, हे मी विसरू शकत नाही...दुर्दैवानं !

शिरूभाऊ : (संतापून छडी हलवीत) जिजी, तुला बजावून ठेवतोय्...परत असा प्रसंग झाला, तर...याद राख...

जिजी : (रागाने) तुम्ही कोण मला बजावणारे ? कोण तुम्ही ?

शिरूभाऊ : मी कोण ?

[छडी उगारून पुढे येताच यदुनाथ छडी हिसकावून घेतो.]

यदुनाथ : परत असा प्रसंग येण्याचा प्रश्नच नाही....कारण तुम्हां दोघांनाही इथं राहता येणार नाही, भाऊ...

शिरूभाऊ : (बेपर्वाईने) अरे, जा जा... ! त्या बॅगा नेऊन आत ठेव.

[ तो धावत जातो आणि त्या बॅगांवर लाथ मारून भिरकावतो. ]

शिरूभाऊ : ( रागाने ओरडतात. ) यदू...
यदुनाथ : आज माझ्या हातून काहीतरी भयंकर घडणार आहे !
शिरूभाऊ : खूप पाहिलेत...थोबाड फोडीन... !
यदुनाथ : आज रात्री....हिनं संमती दिली...तर संभोग... ! नाहीतर बलात्कार... मी.... मी... करणार... ! ( एकदम तिला जवळ घेत ) शैला.... यांच्यापेक्षा तीस वर्षांनी तरुण आहे मी...
शैला : श्री... हे काय चाललंय्... ?
शिरूभाऊ : ( भडकून ) हरामखोर.... !

[ त्याच्या अंगावर धावून हात उगारतात...तोच यदुनाथ वरच्यावर त्यांचा हात पकडतो आणि पिरगळल्यासारखा करतो...दुसऱ्या हाताने शिट्टी मारतो...त्याच क्षणी खालून आठदहा शिट्ट्या ऐकू येतात... शिट्ट्या ऐकून शिरूभाऊ चमकतात. ]

यदुनाथ : ( त्यांचा हात सोडून ) जा, पाहून या...

[ ते आणि शैला गॅलरीत जातात...पुन्हा खालून शिट्ट्या ऐकू येतात. शिट्ट्या ऐकून शिरूभाऊ आणि शैला टरकतात. ]

शिरूभाऊ : हे गुंड...मवाली तू कशासाठी जमवले आहेस ?
यदुनाथ : तुमच्यासाठी.
शैला : ( घाबरून ) श्री...इथं धोका आहे...आपण जाऊ....दुसरीकडे कुठं-तरी....
शिरूभाऊ : अग, पण आता ऐनवेळी कुठं जाणार ?
यदुनाथ : शालिमार...थ्री झीरो थ्री....
शिरूभाऊ : शटप् ! ( ते आणि शैला बॅगा उचलतात. ) लक्षात ठेवा...खर्चाला एक दमडीही मिळणार नाही....टाचा घासून मराल, तेव्हा कळेल...

[ काळोख होतो. ]

## दृश्य : दुसरे

[ तेच घर. शिरूभाऊ घर सोडून गेल्याला बरोबर एक वर्ष झालेलं आहे. वेळ सायंकाळची. यदू एकटाच घरी बसला आहे. आरामात बसून सिगारेट ओढतो आहे.... बाजूला टेपरेकॉर्डरवर गीत चालू आहे. दरवाजा उघडा आहे. उघड्या दारातून फडके येतात. त्यांच्या हातात एक भरलेली पिशवी आहे. त्यांना बघतांच यदुनाथ पटकन सिगारेट विझवतो आणि टेप बंद करतो. आदराने उठून उभा राहतो. ]

यदुनाथ : आत्ता भिव, .हून आलात, काका ?

फडके : हो ! हा आत्ताच येतोय्...

यदुनाथ : भिवंडीला नीताकडे तुम्ही खूपच रूळलेले दिसताय्...मला तर चैन पडत नाही...तुम्ही इथनं सोडून गेलात, म्हणून.

फडके : रिटायरमेन्टनंतर माझाही इथं वेळ गेला नसता. नीताचाही हट्ट होता. मी तिच्याकडे राहावं...

यदुनाथ : तिथं तुमचा वेळ कसा जातो.... ?

फडके : उत्तम जातो. जावयाच्या धंद्याचे थोडे हिशेब बघतो. मी माझा सगळा फंड तिथंच घातलाय्. हिशेब पाहिलेले बरे...( हसतात... थांबून ) बाकीचा वेळ नातवाबरोबर....आता आपण आपल्या मुलात राहिलं पाहिजे....नाही ?

यदुनाथ : ( विचार करीत गदगदलेल्या आवाजात ) हे सुख आमच्या नशिबी नाही.

फडके : कसलं ?

यदुनाथ : ( दुःखभराने ) हेच ! वडिलांच्या छायेत राहायचं...

[ ते त्याचा खांदा थोपटतात. ]

यदुनाथ : काका, आज दिवस कुठला आहे ? ( आवाज जड होतो. )

फडके : कुठला ?

यदुनाथ : भाऊंनी घर सोडलं, त्याला आज एक वर्ष झालं...तेवीस डिसेंबर !

फडके : ( विचार करीत ) कधीच एक वर्ष गेलं...

यदुनाथ : ( कडू आवाजात ) आणखी किती जातील...( थांबून ) हल्ली कधी

भेटले होते भाऊ?

फडके : एकदाच मध्यंतरी...

यदुनाथ : बरोबर कोण होतं?

फडके : नाही! हल्ली ते नवसारीला असतात...शैलाबरोबर!

यदुनाथ : ऐकलं होतं...( थांबून स्वतःशीच विचार करीत ) माणसाचं मन काय असतं, नाही? ( फडके लक्ष देतात. ) त्या वेळी मी...जिजीनं बंड केलं.. एक प्रश्न सोडवण्यासाठी! ( कडवट हसत ) आता? जिजी रात्ररात्र झोपत नाही...मध्यरात्री उठून गॅलरीत येऊन बसते. वेड्या-सारखी करते....तिला कसले तरी भास होतात...

फडके : प्रश्न सोडवून उत्तरं काढली, तरी उत्तरंसुद्धा पुन्हा प्रश्न निर्माण कर-तात. ( थांबून ) जिजी आहे घरात?

यदुनाथ : नाही! ती हल्ली योगाच्या ट्यूशन्स करते...

फडके : हो, हो! बरं ते...वेळही जातो....चार पैसेही मिळतात.

यदुनाथ : कधी कधी तिला उशीर होतो ..

[ तवढ्यात उघड्या दरवाज्यातून श्यामा येते. ती गडबडीने येते.... तिने पिशवीतून भाज्या वगैरे आणल्या आहेत. ]

श्यामा : ( चमकून ) काका, तुम्ही कधी आलात?

फडके : हा आत्ता येतोय्...तुला उशीर झाला का?

श्यामा : येताना भाज्या...काही ना काही आणायचं असतं....जिजीला वेळ मिळत नाही.. तिच्या ट्यूशन्स असतात. बसा हं...( आत जाऊ लागते....)

फडके : ( पिशवी देत ) ही आत ठेव.

श्यामा : वांगी का? भिवंडीची?

फडके : माहीत नाही! नीतानं काहीतरी दिलंय्...

श्यामा : ( जाता जाता ) बसा हं, काका...कॉफी आणते....

फडके : ( चमकून ) आईस्क्रीम—कॉफी?

श्यामा : ( वळून, खिन्नपणे, गंभीर होत ) हल्ली आम्ही आईस्क्रीम करीत नाही... किंवा विकतही आणत नाही...

फडके : ( एकदम चपापून, गंभीर होत ) सॉरी...माझ्या लक्षात नाही राहिलं.

[ श्यामा गडबडीने स्वयंपाकघरात जाते. यदुनाथ आणि फडके काही क्षण शांत आणि गंभीर...]

यदुनाथ : हल्ली आम्ही कोणीच आईस्क्रीम खात नाही. भाऊंना फार आवडायचं ना...!

फडके : माझ्या लक्षात नाही राहिलं !

यदुनाथ : दारू जास्त झाली, म्हणजे माझे मित्र दोन दोन प्लेट आईस्क्रीम खातात. मग ओकारी येत नाही (डोळे पुसत) मी ओकतो....पण आईस्क्रीम खात नाही.

[ त्याचा आवाज रडवेला होतो. फडक्यांना वाईट वाटते...ते उठतात आणि मायेने त्याला कुरवाळतात. ]

फडके : पिणं चालूच आहे का ?

यदुनाथ : क्वचित कधीतरी...मन अस्वस्थ झालं, तर....

फडके : तुझं गॅरेज कसं चाललंय्...?

यदुनाथ : आठ महिने झाले गॅरेज उघडून....पण वाईट नाही...माझ्यापुरतं मिळतं. कुणाचा भार कुणावर नाही. आम्ही तिघंही कमवतो. एका वेगळ्या आयुष्याची...जबाबदारीची सवय होतेय्....

फडके : जिजींना सांभाळ... तिला त्रास होईल, असं काही करू नकोस....

यदुनाथ : (त्यांच्याकडे बघत राहतो. थोडा वेळ विचार करून) काका, एक विचारू का ? रागावणार नाहीत ना ?

फडके : पैसे हवेत का ? (तो मानेने 'नकोत' म्हणतो) मग काय विचारणार आहेस ?

यदुनाथ : (अडखळत) तुम्हांला लग्न करण्याची इच्छा आहे ?

फडके : कुणाशी ?

यदुनाथ : जिजीशी....

[ फडक्यांना अनपेक्षितपणे तोंडावर काहीतरी आपटावे, असे होते. क्षणभर ते काहीच बोलू शकत नाहीत. यदुनाथ मात्र उत्तरासाठी त्यांच्या तोंडाकडे बघत राहतो. ]

फडके : (स्वतःला सावरत) हे तू, यदुनाथ, जिजींना विचारायला हवं होतंस.

यदुनाथ : मी तिला विचारलं होतं...

फडके : कधी ? त्या काय म्हणाल्या ?

यदुनाथ : ती म्हणाली, हे तू फडकेकाकांना विचारायला हवं होतंस.

[ दोन क्षण एकदम शांतता. फडके विचारात मग्न....नंतर ]

फडके : ( उठत, आपल्याशीच बोलल्याप्रमाणे ) यदुनाथ, काही नात्यांत एक वेगळी सुंदरता असते. तेवढ्यातच आपण समाधान मानावं...! (जरा दूर जाऊन खिडकीतून बाहेर बघत ) एखादं जहाज किनाऱ्या-पासून दूर उभं राहतं....किनारा बघत... ( क्षणभर तसेच बाहेर बघत राहतात... खिशांतून बंद लखोटा काढून ) दे पत्र जिजींना दे!

[ यदुनाथ ते पत्र बघत असताना फडके पटकन आवेगाने निघून जातात.
यदुनाथ पत्र बघत तसाच उभा आहे. वेड्यासारखा. तेवढ्यात श्यामा आतून दोन कप कॉफी घेऊन येते. ]

श्यामा : ( येता येता ) काका, जिजी म्हणत होती...

[ यदुनाथ भानावर येतो. फडके तिथे नाहीत, हे दोघांच्याही लक्षात येते. ]

श्यामा : यदू, काका कुठं गेले ?
यदुनाथ : ( गोंधळून ) गेले वाटतं ते !
श्यामा : अरे, पण मी कॉफी केली होती त्यांच्यासाठी....
यदुनाथ : मला कळलंच नाही.
श्यामा : काय ?

[ कप ठेवून गॅलरीत बाहेर बघते. ]

यदुनाथ : काका कधी गेले, ते....
श्यामा : ( परत येत संशयाने ) तू बोललास का काही त्यांना ?
यदुनाथ : नाही...
श्यामा : मग ते एकदम जातील कसे ?
यदुनाथ : मी त्यांना एक विचारलं... आधी विचारू का, विचारलं...आणि....
श्यामा : काय ?

यदुनाथ : तुम्हांला लग्न करण्याची इच्छा आहे का?
श्यामा : अरे गाढवा, मी त्यांच्या मुलीच्या वयाची आहे....
यदुनाथ : (वैतागून) तुझ्याशी नव्हे, ग....जिजीशी...
श्यामा : (चमकून, दचकून) जिजीशी?
यदुनाथ : हो!
श्यामा : ते होय म्हणाले?

[ती घाबरते.]

यदुनाथ : नाही!
श्यामा : (उत्कंठेने) नाही म्हणाले?
यदुनाथ : नाही! ते म्हणाले, हे तू जिजीला विचारायला हवं होतंस...
श्यामा : मग?

[तो उत्तर न देता तिच्या डोळ्यांत बघत राहतो.]

श्यामा : अरे, पण तू आधी जिजीला तरी विचारायचंस?
यदुनाथ : मी जिजीला विचारलं होतं...
श्यामा : मग जिजी काय म्हणाली?

[काही न बोलता यदुनाथ खिशातून छोटी चपटी बाटली काढतो आणि बूच उघडतो... ती त्याच्यावर झडप घातल्यासारखी त्याला आवरते.]

श्यामा : आजचा दिवस तरी पिऊ नकोस.... (तो बाटलीला बूच लावीत आत जाऊ लागतो. त्याचा दंड धरून...) मग जिजी काय म्हणाली?
यदुनाथ : (विसरून) कशाबद्दल?
श्यामा : लग्नाबद्दल...
यदुनाथ : जिजी म्हणाली...हे तू त्यांना विचारायला हवं होतंस...

[तेवढ्यात पायांचा आवाज होतो, म्हणून ती दोघेही उघड्या दरवाज्याकडे बघतात. क्षणभराने उघड्या दरवाज्यातून जिजी येते. काहीशी थकलेली. चेहरा तेलकट, उतरलेला....केस कसेतरी...खांद्यावर शबनम

पिशवी...ती आल्याबरोबर दोघेही तिच्याकडे क्षणभर बघत राहतात. कोणीतरी अनोळखी बाई आल्यासारखी....]

जिजी : (दोघांकडे बघत) काय झालं?
श्यामा : खाली फडकेकाका भेटले?
जिजी : दिसले दुरून! का?
श्यामा : काही म्हणाले?
जिजी : नाही! पाहिलं, की पाहून न पाहिल्यासारखं केलं, कोण जाणे...

[यदुनाथ आत जातो.]

श्यामा : अग, यदूनं आज आगाऊपणा केला....
जिजी : काय?
श्यामा : त्यांना विचारलं, तुम्हांला लग्न करण्याची इच्छा आहे का?
जिजी : कुणाशी?
श्यामा : तुझ्याशी....!

[जिजी पटकन खुर्चीत बसते. क्षण, दोन क्षण कोणीच काही बोलत नाही....मग...]

जिजी : ते काय म्हणाले?
श्यामा : ते म्हणाले, हे तू जिजीला विचारायला हवं होतंस...
जिजी : (एकदम मान उचलून श्यामाकडे बघत) मग....?
श्यामा : यदू म्हणाला...हे मी जिजीला विचारलं होतं....जिजी म्हणाली, हे तू फडकेकाकांना विचारायला हवं होतंस...

[जिजी श्यामाचे दोन्ही हात धरते....आणि व्याकुळतेने तिच्याकडे बघत राहते.]

श्यामा : जिजी, असं तू म्हणाली होतीस?

[तिचा आवाज कातर होतो...]

जिजी : नाही, श्यामा ! त्यानं मला विचारलंही नाही आणि मी तसं म्हणालेही नाही.

श्यामा : तो खोटं बोलला ?

जिजी : (विचार करीत) बोलू दे...

श्यामा : (काहीशी चिडून) मी त्याला बोलावून आणते....तू खडसाव त्याला.

[तो पत्र देण्यासाठी म्हणून बाहेर येतो. दारातच थबकतो....ऐकतो.]

जिजी : असू दे, ग ! त्याच्याही मनाला प्रश्न पडत असतील...त्यानं उत्तर शोधलं स्वतःसाठी आणि सगळ्यांसाठी...

यदुनाथ : (पुढे येत) ते म्हणाले....काही नात्यांत एक वेगळीच सुंदरता असते.... त्यातच आपण समाधान मानावं. (थांबून) एखादं जहाज किनाऱ्यापासून दूर उभं राहतं....किनारा बघत...(पत्र देत) त्यांनी हे पत्र दिलंय्....

[ती पाकीट फोडत असताना यदुनाथ आणि श्यामा उत्कंठेने तिच्याकडे बघत राहतात. ती पत्र वाचताना त्यांची उत्कंठा उफाळून येते. पत्र वाचून ती पत्राची घडी करते, आणि लखोटा ब्लाऊजमध्ये सारत असताना अंधार होतो.]

## दृश्य तिसरे

[तेच घर. मध्यंतरी पाच वर्षे उलटली आहेत. मध्यरात्रीनंतरची वेळ. दिवाणखान्यात अंधार आहे. रस्त्यावरच्या दिव्यांमुळे धूसरसे आत दिसते, तेवढेच.
दुरून कुत्र्याच्या भुंकण्याचा किंवा मांजरांच्या भाडणाचा आवाज येतो. सबंध घर थरथरेल, असा आवाज करीत एक ट्रक धडधडत जातो. शेजारच्या किंवा त्याच इमारतीत कोणीतरी झोपेत ओरडल्याचा, मध्येच दोन–चार मांजरे फिस्कारून भांडल्याचा आवाज. पाठोपाठ कोणीतरी काठी आपटून मांजरांवर ओरडल्याचा आवाज. दोन क्षण शांतता. मग श्यामा एकदम भयभीत होऊन आपल्या बेडरूममधून बाहेर येते. हाका मारीत जिजीला शोधते.]

श्यामा : (काळोखात) जिजी... जिजी... कुठं आहेस तू ? (दिवा लावते) जिजी...(जिजी आपल्या बेडरूममधून बाहेर येते.) तू तिथं झोपली

होतीस ?

जिजी : (पुढे येत...आवाज थकलेला...) तुझ्या खोलीत आज झोपच येईना.

श्यामा : मांजर भांडल्याचा आवाज आला, आणि मी जागी झाले. बघते, तर तू नाहीस. काय भ्याले मी...म्हटलं, गेलीस कुठं....?

जिजी : जाणार कुठं ? जरा म्हणून डोळा लागेना.

श्यामा : दुसऱ्यांना झोप यावी, म्हणून योगासनं शिकवतेस....

जिजी : थोडा वेळ आमच्या बेडरूममध्ये झोपून पाहिलं...खूप वर्षांनी झोपले तिथं.

श्यामा : मग झोप तिथं, झोप येत असेल, तर....

जिजी : (थकून बघते) जरासा डोळा लागला. पण हात शेजारी गेला. रिकामं अंथरूण हाताला लागलं, आणि झोप उडाली. (झोपेतच बोलल्यासारखी बोलते.) नवरा बिछान्यात होता, तेव्हाही मी एकाकी...आणि अशांत होते. आता नवरा जवळ नाही, म्हणूनही मी तशीच. त्याहून अधिक एकाकी, आणि अशांत. (थांबते. विचार करते) शेवटी आपल्याला काय हवं असतं, तेच कळत नाही. सहा...आता सहा वर्षं झाली, ते इथनं गेल्याला.

श्यामा : ते गेले नाहीत, जिजी ! तू घालवलंस त्यांना....

जिजी : (एकदम चिडून) हो, घालवलं ! मी घालवलं... झगडले अन्याया-विरुद्ध ! त्यानं मला बळ दिलं, पण ते बळ आता का नाही माझ्यात ? त्या वेळी...त्या वेळी ते मला सतत फसवतात, माझा तिरस्कार करतात, एवढा एकच विचार मला त्रस्त करायचा. आता ते जवळ नाहीत, तर त्यांचा चांगुलपणा आठवतो. त्यांनी आपल्या सर्वांसाठी काय काय केलं, ते आठवतं...आणि....(ती गदगदते.)

श्यामा : मग त्याच वेळी का नाही बेरीज–वजाबाकी केलीस ?

जिजी : तसं करता आलं असतं, श्यामा, तर संसारातले कितीतरी क्लेश मिटले असते !... त्या त्या वेळी आपण चुकाच जगत असतो...म्हणून अलिप्त-पणे त्या कळत नाहीत.

[क्षणभर शांतता. रस्त्यावरून एक मोटार वेगाने गेल्याचा आवाज.]

श्यामा : (जांभई देत) तू आता झोपत का नाहीस ?

जिजी : मला झोप येणार नाही ! तू झोप जा.

[ श्यामा जाते. जिजी क्षणभर खिडकीतून किंवा गॅलरीतून बघत राहते. तेवढ्यात हळूच दरवाज्यावरची बेल वाजते. जिजी दरवाजा उघडते. दारात बॅग घेऊन शैला उभी. ]

जिजी : ( चमकून ) तू ? एवढ्या पहाटे ?
शैला : नवसारीहून आले ! स्टेशनवरनं सरळ इथं आले... ( ती हातातली बॅग बाजूला ठेवते. जिजी तिच्याकडे संशयाने पाहत राहते. )
जिजी : का ? यांचा काही निरोप आहे ?
शैला : नाही ! त्यांना मी सोडून आलेय् .
जिजी : का ?
शैला : या प्रश्नाला, जिजी, उत्तर नसतं ! गरजा संपल्या, एवढंच म्हणायचं !
जिजी : फक्त शरीराच्या ओढीनं जवळ येणं म्हणजे संसार नव्हे.
शैला : त्यांची ती ओढ सुद्धा आता संपली आहे...तुम्हांला कळलेलं नाही ?
जिजी : ( काळजीने ) काय ?
शैला : पॅरॅलिसिस्नं ते लुळे पडलेत.
जिजी : ( काळजीने ) कधी ? आणि कळवलं नाही ते ?
शैला : तीन महिने झाले ! आता बरे आहेत...बरे म्हणजे...( थांबते ) तुम्हांला त्या वेळी कळवावं, असं मी म्हणत होते.... पण तेच नको म्हणाले. ( जिजी एकदम सुन्न होते )....मला नर्स म्हणून कायमचं राहणं शक्य नव्हतं ! म्हणून आले...ते नवसारीलाच आहेत.
जिजी : ( स्वतःशीच ) बायको आणि बायका यांतला फरक कळायला जिवावर बेतावं लागलं ! ( शैला बॅग उचलते. ) तू कुठं चाललीस ?
शैला : बघायचं ! ( वळता वळता– ) तुम्ही तुमच्या नवऱ्याला परत घ्याल... माझा नवरा मला परत घेणार नाही...( ती जिजीवर एक कटाक्ष टाकते आणि निघून जाते. जिजी क्षण, दोन क्षण उघड्या दारातून पाहत राहते. तेवढ्यात श्यामा आपल्या खोलीतून बाहेर येते. )
श्यामा : तू, जिजी, कुणाशी बोलत होतीस ?
जिजी : ( दरवाजा बंद करीत ) शैला आली होती.
श्यामा : कशासाठी ?
जिजी : तिनं त्याना सोडलंय्...त्यांना पॅरॅलिसिस्चा अ‍ॅटॅक आलाय् .
श्यामा : ( एकदम काळजीने ) कधी ?
जिजी : तीन महिने झाले !
श्यामा : आपल्याला जायला नको !

जिजी : (एकदम खंबीर होत–) कशासाठी? एका शब्दानं कळवलंय्? एक फोन....एक पत्र?...काही जायला नको!

[श्यामा एकदम भावनावेगाने जिजीला मिठी मारते आणि खांद्यावर डोकं टेकून रडू लागते. जिजीनंही कितीही खंबीरपणाचा आव आणला, तरी तीही विरघळते. अंधार होतो.]

## दृश्य चौथे

[तेच घर. काही दिवसांनंतर. संध्याकाळची वेळ. कापडी घडीच्या खुर्चीत यदुनाथ सिगारेट ओढत बसला आहे. समोर स्टुलावर ग्लास, व्हिस्कीची. क्वार्टर बाटली. पाण्याचा तांब्या. पाठीमागे मान टेकून तो स्वस्थ बसला आहे— विचार करीत. तेवढ्यात लॅचकीने दार घाई घाईने श्यामा येते. तिच्या हातात आईस्क्रीमचे उघडून पार्टी–पॅक आहे.]

श्यामा : (आत येताच....घाबरलेली....) यदू, जिजी आलीय्?

यदुनाथ (पितो.) नाही अजून...

श्यामा : (करवादून) पुनः प्यायला लागलास?

यदुनाथ : आज मला अस्वस्थ वाटतंय्... (ती बघत राहते.) जिजी एकदा म्हणते, नवसारीला जायचं....एकदा म्हणते, नको.

श्यामा : (काहीतरी सांगण्यासाठी) यदू....

यदुनाथ : आज आईस्क्रीम!

श्यामा : यदू, ते (दारू वगैरे) लपव आधी....

यदुनाथ : का?

श्यामा : खाली 'आसरा'मध्ये मला भाऊंसारखे कोणीतरी दिसले.

['हॅः' असे करीत तो हात उडवतो. तोच दरवाज्यावरची बेल वाजते. श्यामा दरवाजा उघडते. दारात शिरूभाऊ. त्यांना अर्धांगाचा झटका येऊन गेला होता. त्याच्या खुणा...पण निश्चित अर्धांग झाला आहे, ते कळत नाही. पण ते थकले आहेत. कपडे ढगळ. केसांवर रुपेरी झाक. हातात आधारासाठी काठी.]

श्यामा : (दचकून, घाबरून; पण आनंदाने) भाऊ! या...आत या...यदू, भाऊ

आलेत... ( आत धावता धावता ) बसा, भाऊ! ( पॅक घेऊन धावत स्वयंपाकघरात जाते. )

[ शिरूभाऊ दोन पावले आत येतात. भिंतीच्या आधाराने मलूलपणे उभे राहतात. त्यांना काय झाले आहे, हे यदुनाथच्या लक्षात येत नाही. ते जिथे उभे आहेत; तिथे त्यांचा जुना रुबाब दाखविणारा फोटो आहे... शक्तीचे प्रतीक असे पुतळे आहेत किंवा वाघाचे मुंडके... तिथे शिरू भाऊ सगळी शक्ती गळून गेल्यासारखे उभे आहेत. यदुनाथ उठतो. त्यांना बघतो... आणि... ]

यदुनाथ : इथं राहायला आला आहात? (ते होकारार्थी मान हलवितात.) ते शक्य होणार नाही, भाऊ! (ते एकदम अपमानित होतात. त्यांचा गळा दाटून आला असावा. भावनावेगाने ते आवंढा गिळून बघत राहतात.) हे सांगताना, भाऊ, मला दुःख होत नाहीये, असं समजू नका!...मला आतल्या आत टाहो फोडून रडावंसं वाटतंय्... (ते दुःखी नजरेने बघत राहतात) सहा वर्षं झाली, भाऊ! आम्हांला आता एका वेगळ्या आयुष्याची सवय झालीय् ...आम्ही सुखी आहोत, असं नाही! ....नाही! दुःखीच आहोत आम्ही! जिजी तर अधिकच! पण आता आम्हांला कुणाचा जाच नाहीये...रोजच्या रोज कुणाला तरी घाबरून घाबरून जगायचं....हे आमच्या नशिबीचं सुटलंय्...आम्हांला तिघांची सवय झालीय्....चौथं कुणी नको आहे या घरात...चांगलं आणि वाईट यांतली ही निवड नाही! वाईट आणि कमी वाईट यांतली ही निवड आहे... (बोलता बोलता तो खिडकीतून बाहेर बघतो. बघता बघता बोलत राहतो. पण त्याचे बोलणे संपायच्या आधीच शिरूभाऊ दरवाज्यातून निघून जातात.) मला क्षमा करा, भाऊ.... (वळून बघतो, तर जागेवर शिरूभाऊ नाहीत. आश्चर्याने दरवाज्यातून तसाच बघत राहतो. क्षण, दोन क्षण विरक्त सूर ऐकू येतात. तेवढ्यात आईस्क्रीम-कॉफीचा ग्लास घेऊन घाईघाईने श्यामा येताना दिसते. ओतेल म्हणून तिचं कॉफीवर लक्ष.)

श्यामा : (येता-येता) भाऊ, तुमच्या आवडीची आईस्क्रीम कॉफी.... (एकदम समोर बघते. भाऊ नाहीत.) यदू... (तो तिच्याकडे बघतो.) अरे, भाऊ कुठं गेले?

यदुनाथ : (अस्वस्थ होतो...गपकन व्हिस्की तोंडात टाकतो.) भाऊ गेले.

श्यामा : ( दचकून ) का ?
यदुनाथ : मी त्यांना सांगितलं...( ग्लासात बाटली ओतू लागतो )
श्यामा : ( बाटली ओढून घेत ) काय ? काय सांगितलंस ?
यदुनाथ : की आम्हांला पूर्वीचं आयुष्य आता पुन्हा नको आहे. ( गदगदतो ) तुम्हांला इथं राहता येणार नाही.
श्यामा : ( व्याकूळ होऊन त्याला गदगदा हाल्वीत- ) अरे, तू असं का...का बोललास ?
यदुनाथ : भाऊ इथं राहिले, तर तुला चालेल ?
श्यामा : ( चिडून ) का नाही चालणार ?

[ तेवढ्यात उघड्या दारातून जिजी येते. तिच्याही हातात आईस्क्रीम-पॅक आहे. चेहऱ्यावर विलक्षण भेदरलेपणा आहे. ]

जिजी : काय झालं ?
श्यामा : तुला खाली भाऊ दिसले ?
जिजी : 'आसरा'मध्ये पाहिले मी.
श्यामा : अग, ते आता इथं येऊन गेले....
जिजी : गेले ? का ?
श्यामा : यदूनं त्यांना घालवलं....
यदुनाथ : घालवलं नाही ! आम्हांला आता जुनं आयुष्य नको आहे, असं मी सांगितलं...ते इथं राहिले, तर ते चालेल तुला ?
जिजी : का नाही ? ते वडील ना तुमचे ? आणि आता वय काय त्यांचं ? प्रकृती पाहिलीस ना त्यांची ? ( तिचा आवाज कातरतो. )
यदुनाथ : आणि पूर्वी सारं घडलं, ते ?
जिजी : ते आपण विसरायला हवं ! अरे, विसरण्यानं, एकमेकांना क्षमा करण्यानं आपली मनं मोठी होतात....कुटुंबं टिकतात.
यदुनाथ : मग हे शहाणपण त्या वेळी का नाही सुचलं ?
जिजी : ( गडबडीने ) त्यांना ?
यदुनाथ : त्यांना नाही, तुला !
जिजी : ( काकुळतीने ) अरे, वेळच्या वेळी शहाणपण सुचतं, ती शहाणी माणसं....आपण वेडी माणसं....आम्हांला चुका करून झाल्यावर त्या चुका होत्या, हे कळतं ! तेवढंच आमचं शहाणपण ! ( यदुनाथ बाटली वगैरे लपवीत असताना ती स्वतःशीच बोलल्यासारखी बोलू लागते. )

मनासारखा जोडीदार आधी कधी मिळत नाही...चुकून मिळाला, तरी तो शेवटपर्यन्त मनासारखा राहत नाही !...शेवटी जुळवून घेणं हेच महत्त्वाचं ! ( निर्धाराने ) श्यामा, तू खाली जा...घेऊन ये त्यांना.... आले, तर !

[ श्यामा धावत खाली जाते. पर्समधली फणी काढून केसांवर फिरवते. नीटनेटकी होते, आणि दरवाजा सताड उघडून स्वागतासाठी उभी राहते. ]

जिजी : ( स्वतःशीच पुटपुटते. ) वादळात भटकलेलं जहाज आज किनाऱ्याला परत येतंय्...

[ तेवढ्यात श्यामाच्या खांद्यावर हात ठेवून शिरूभाऊ काठी टेकत आत येतात. श्यामा आनंदाश्रू पुसत धावत स्वैपाकघरात जाते. शिरूभाऊ सबंध घरावर नजर फिरवीत बघत राहतात. जिजी त्यांचा लुळा हात हातात घेते. शिरूभाऊंना गदगदल्यासारखे होते. ]

शिरूभाऊ : भर दुपारच्या उन्हातून एकदम वडाच्या सावलीत आल्यासारखं वाटलं ! शान्तपणानं पहुडावंसं वाटतंय्... ( ती समाधानाने बघत राहते. ) त्या रात्री....सहा वर्षांपूर्वी इथनं गेलो, त्या रात्री...

जिजी : ते जुनं सगळं विसरू आपण... ! नवी वाट जमते का, बघू....

शिरूभाऊ : फडके काय म्हणतात ?

जिजी : ते भिवंडीला असतात....नीताला दुसरा मुलगा झालाय्...

शिरूभाऊ : येतात इथं ?

जिजी : पाच वर्षांपूर्वी एकदा आले होते....यदूकडे एक पत्र ठेवून गेले.... वाचणार ? ( ते 'हो' म्हणतात. ती टेबलाच्या खणातून पत्र काढून देते. ते वाचताना टेपवरून पत्र ऐकू येते. ) 'एवढंच सांगण्यासाठी हे पत्र...की दरवाज्याला आतून कडी लावू नका ! लॅचकी लावून शिरूभाऊ कधीही आत येतील...त्यांना येऊ द्या ! सगळं विसरून त्यांना तुमच्यांत घ्या. आदर्श जोडपी कुठंही नसतात...दिसतात, ती सुद्धा तशी असतातच, असं नाही ! म्हणूनच आपण सतत त्यांच्या शोधात असावं... शिरूभाऊ घरी नसल्यामुळं यावंसं वाटत नाही. ते आले, म्हणजे पूर्वीसारखा येईन.' ( शिरूभाऊ हळूच डोळ्यावरून बोट फिरवतात. )

शिरूभाऊ : (स्वतःशीच) ग्रेट सोल! (पत्र तिला देतात. तेवढ्यात श्यामा आइस्क्रीम–कॉफीचा ग्लास घेऊन येते.)
श्यामा : आइस्क्रीम–कॉफी, भाऊ! तुम्हांला आवडते ना?

[ ते समाधानाने हसतात. ग्लास बाजूला ठेवून तिला जवळ घेतात. ]

शिरूभाऊ : यदू, असा लांब का?
श्यामा : तो तुम्हांला मघाशी बोलला ना, भाऊ?
शिरूभाऊ : चूक त्याची नाही! (हाक मारतात) यदू...
जिजी : यदू...(यदू वळून बघतो.)
शिरूभाऊ : यदुनाथ....ये....जवळ ये...!

[ तो भावनावेगाने पुढे येतो आणि त्यांच्या गळ्यात मिठी मारून रडू लागतो. क्षणात वातावरण भावनामय होते. आणि... ]

प ड दा

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
क्र. क्र. 22309 नों. दि 3/3/66
वि. ........सारक.... क्र. ..................

IRBK-0122371